**माणूस** शनिवार । १० फेब्रुवारी ७३ । पन्नास पैसे

चाचा हो चि मिन्ह हा स्वतः अत्यंत शिस्तबद्ध, प्रसिद्धीपराङ्मुख आणि स्वतः मागे राहून इतरांना पुढे पुढे प्रसिद्धीच्या झोतात ढकलणारा. स्वतःच्या हयातीत त्याने उत्तर व्हिएतनामच्या कोणत्याही रस्त्याला, चौकाला, वास्तूला अथवा उद्यानाला स्वतःचे नाव देऊ दिले नाही...

मग हो चि मिन्ह ट्रेल, हो चि मिन्ह मार्ग, हा काय प्रकार आहे?

## माणूस यापुढील अंक । व्हिएतनाम विशेषांक



## सप्रेम नमस्कार...

७ जानेवारी १९७३

◻ सौ. पुष्पा भावे यांच्या २३ डिसेंबरच्या अंकातील लेखाबद्दल तुमचे व त्यांचे अभिनन्दन करावे असा विचार करत असतानाच ६ जानेवारीचा अंक हाती आला. त्यातील दातारबाईंचे पत्र वाचून माझा पार गोंधळ उडाला आहे. भावेबाईंची सर्व मते मान्य केल्यावर आणखी काय राहिले ? 'बरं सारी व्यवस्था बदलली पाहिजे' असे म्हटल्याने प्रश्नाच्या मुळाशी जाऊन शोध घेतला जातो असे त्यांचे म्हणणे आहे की काय ?

बरे ७०% चे स्वातंत्र्य, ९०% च्या जीवनावर न होणारा परिणाम अशा भोंगळ विधानांना अर्थ काय ? भूमिहीनांना जमीन मिळणे म्हणजे स्वातंत्र्य ? सरकारी धोरण बदलले की स्वातंत्र्य आले ? माझ्या काही लक्षात येत नाही. मी एक साधा सामान्य माणूस आहे. 'अन्न खाण्याचे स्वातंत्र्य, मर्यादित' वगैरे शब्दांच्या घोषणा मी अनेकांच्या ऐकल्या आहेत.

झोपडपट्ट्यांच्या प्रश्नाबद्दलची सर्वासारखीच थोरड दातारबाईंनीही केली. त्यामुळे नेमके त्या काय म्हणताहेत हे कळलेच नाही. रोज आठ तास काम करून आठशे रुपये दातारबाई मिळवतात ही बातमी ऐकून आनंद वाटला. बहुतेक दातारसाहेबांनाही १२०० रुपये पगार असेल.

तेव्हा, माझ्या सामान्य मनाला एक प्रश्न पडतो, की ही पोपटपंची करणाऱ्या दातारबाई आपल्या बाईचा पगार वाढवत का नाहीत ? केवळ फॅशन म्हणून 'आम्ही त्यांच्या जिवावर स्वातंत्र्य भोगतो' म्हणायचे व तसेच भोगत राहायचे. किंबहुना अधिकच exploit करत मोटारीतून हिंडायचे, cocktail parties करायच्या. पुनः मानभावीपणाने अस्वस्थपणाच्या गप्पा मारायच्या ह्याची मला चीड येते. आणि नेमके

संपादक
श्री. ग. माजगावकर

१० फेब्रुवारी १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : बारा अंक : छत्तीस

हेच दातारबाईंनी केले. charity begins at home, Madam !

भावेबाईंनी जो मुद्दा मांडला त्याचा व ह्याचा खरे म्हणजे संबंध नव्हता. तरीही दातारबाईंनी तो ओढून ताणून आणला. त्यामुळे हा प्रपंच, ही व्यवस्था बदलली पाहिजे, मूल्य बदलली पाहिजेत, हे वाचले. बाई, ही व्यवस्था बदलायला तुम्ही काय करता आहा ? व्यवस्था बदलणे म्हणजे गादी-वरचा पलंगपोस बदलण्याइतके सोपे आहे काय ? विषमता का ? मूल्यपद्धती का ? असे प्रश्न निर्माण केले म्हणजे सारे संपत नाही. हे प्रश्न, व त्याची उत्तरे प्रत्येकाकडे आहेत. जे सुशिक्षित, बुद्धिवंत, भारतीय ह्या व्यवस्थेने विकत घेतले असतात' त्यांच्याकडे आहेत, विकत न घेतलेल्याकडे आहेत. (दातार-बाई तुमच्याकडेही आहेत) प्रश्न आहे तुम्ही त्यासाठी काय करू इच्छिता ? किती सालडी सोलून घेऊ शकता ? जाऊ दे, जे जमणार नाही त्याविषयी किती उगाळावे ?

तेव्हा दातारबाई, केवळ मुळाशी शोध घ्यावा म्हटल्याने, मुळाशी गेल्याचे समाधान मिळत असले तर छानच आहे. परंतु खरे समाधान आपण काहीतरी constructive केल्याने मिळते असा सामान्यांचा अनुभव. तसे काही करावे. केल्याचे असेच पत्र लिहून जाहीर करावे. आम्ही तुमचा आदर्श ठेवून काही प्रयत्न करू – अशीच व्यवस्था बदलली तर पाहू. नाहीतर, तुम्ही आम्ही वाहत्या लाल रंगाच्या पाण्यात वाहून जाऊच आणि मग बाई, अशी पत्रेही लिहू शकू की नाही कोण जाणे !

–निरंजन गाडगीळ, मुंबई

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

# मुक्काम मालेगाव

मालेगाव! नासिक जिल्ह्यातील तालुका पातळीवरील सर्वात मोठे शहर. सव्वा लाखावर लोकसंख्या. जातीय दंग्याबद्दल अपकीर्ती सर्वांच्याच कानावर. यंत्रमाग कामगारांवर रंगीत साडी बंदीची, पर्यायाने बेकारीची आपत्ती. एस्. आर. पी. ची खास वसाहत. मोसम (की मोक्षगंगा ?) आणि गिरणा काठची सधन शेतकऱ्यांची वस्ती; ही या गावची वैशिष्ट्ये. मात्र कै. भाऊसाहेब हिरे यांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणून सर्वत्र लौकिक.

सहकार आणि शिक्षण महर्षी कै. भाऊसाहेब हिरे यांनी उभारलेल्या दोन्ही क्षेत्रातील वेलुंचे वटवृक्ष झालेले. गेली दहा वर्षे समाजवादी पक्षाचे श्री. निहाल अहमद यांचा बालेकिल्ला समजला गेलेले मालेगाव! अशा या गावच्या १५० विद्यार्थ्यांना अटक : शिक्षणसंस्था चालकांना घेराव : भीतिपोटी संस्थेचे पदाधिकारी भूमीगत : मालेगावचे भडकलेले विद्यार्थी : अशा बातम्यामुळे अधिकच प्रकाशात आलेले. गेल्या दीड दोन महिन्यापासून हे सारखे ऐकत होतो आणि म्हणूनच एकदा हा प्रकार व वस्तुस्थिती काय आहे ते वृत्तपत्र प्रतिनिधी म्हणन जाऊन पहावे असे ठरवले.

एस्. टी. तून जाताना विद्यार्थी बेजबाबदार होत आहेत काय, या विषयावर जबाबदार नेते मंडळींनी एका परिसंवादात आपापल्या परीने केलेले (वि) संवाद मनात घोळत होते. मालेगावी पोचलो. विद्यार्थी नेत्यांची नावे व पत्ते शोधले.

मनुष्य हा आयुष्यभर विद्यार्थी असतो ह्या लोकमान्यांच्या उक्तीप्रमाणे पाहिले तरच या आंदोलनाला विद्यार्थ्यांचे आंदोलन असे संबोधता येईल. बी. ए. किंवा तत्सम पदवी प्राप्त केलेल्या शिक्षकांच्या नोकरीसाठी आवश्यक असलेल्या बी. एड्.च्या अभ्यास-

क्रमांच्या प्रशिक्षणार्थींचे हे आंदोलन आहे. म्हणजे खऱ्या अर्थाने हे विद्यार्थ्यांचे आंदोलन नाही तर ते शिक्षकांचे आंदोलन आहे आणि हे सर्व आंदोलक आहेत मालेगावच्या महात्मा गांधी विद्यामंदिराने चालविलेल्या बी. एड्. कॉलेजचे विद्यार्थी. त्यांची मागणी आहे...

'आम्ही आता दुष्काळात सापडलो आहोत. दोन-अडीच रुपये रोजी मजुरीने आमचे आईवडील खडी फोडून जीवन कसेबसे जगत आहेत. ते आता आम्हाला शिक्षणासाठी पैसे पाठविण्यास असमर्थ आहेत. तेव्हा या महाविद्यालयात प्रवेश देतेवेळी संस्थाचालकांनी आमच्याकडून बिनापावती जे रुपये ५०० ते १५०० घेतले आहेत ते आमचे आम्हाला परत करावेत. (एकूण विद्यार्थी २६९ आहेत)

मागणी अर्थातच मान्य झाली नाही. प्रशिक्षणार्थ्यांनी आपल्या मागणीसाठी १ डिसेंबर १९७२ पासून संपाचा अवलंब केला. संप चालूच आहे. परीक्षा चालू आहेत पण लोकनेते, शिक्षणमहर्षी, समाजकार्यकर्ते गेल्या दीड महिन्यात आर्थिक तर दूरच पण शाब्दिक सहानुभूतीस देखील पुढे आले नाहीत. सभा, संमेलने, उद्घाटने, दुष्काळ, दौरे आदी विधायक कामात सारेच गर्क असावेत.

मागणी साधी आहे. पाऊण कोटी रुपयांइतके प्रचंड बजेट असलेल्या संस्थेला सहज मान्य होण्यासारखी आहे. मग ती का मान्य होत नाही ? महाराष्ट्र शासनाची यात काहीच जबाबदारी नाही का ? या प्रश्नांची उत्तरे मिळत नाहीत. परंतु जर उत्तरे मिळाली नाहीत तर...

विद्यार्थ्यांची मागणी, त्यातून उद्भवलेला संप, संपफोडीसाठी आणलेले दडपण, त्या दडपणाला न जुमानता विद्यार्थ्यांनी संस्था चालकांच्या भ्रष्टाचाराचे काढलेले वाभाडे याची अनेक दिवसांची लढाई म्हणजेच आज शिक्षणक्षेत्रातील पेढीवाल्यांची नफेबाजी होय. आणखी पुनः यांना शिक्षणमहर्षीच म्हणा !

मालेगावची महात्मा गांधी विद्यामंदिर व आदिवासी सेवा समिती या दोन संस्था म्हणजे जिल्ह्याचा शैक्षणिक उत्कर्ष साधण्याचा मोठा ठेका घेतलेल्या ठेकेदारी संस्था. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांचा स्थापनेमागील हेतू अर्थातच 'शहाणे करूनी सोडावे सकल जन' असा होता. सध्या उद्देश 'गांजूनी नाडावे विद्यार्थीजन' असा दिसतो, त्यामुळे कर्मवीरांचा उल्लेख न करणेच योग्य ठरावे.

तर अशा या अदमासे पाऊण कोटी रुपयांपर्यंतचे बजेट असलेल्या संस्थेचे सर्वेसर्वा आहेत श्री. व्यंकटराव हिरे ! आमदार, वेगवेगळ्या बँकांचे चेअरमन व संचालक, मंत्री, सहकारी कारखान्यांचे अध्यक्ष अशा अनेक भूमिका वठविलेले हे एक अयशस्वी नटसम्राट. तेथे चालणारी पदोपदीची टक्क्यांची भाषा गांधी विद्यामंदिरात येण्यास उशीर झाला नाही. गांधी विद्या मंदिरास अनुदान मिळत असताना महाविद्या-

पृष्ठ ६२ वर

# सरकार लोकांना विश्वासात घेत नाही

## —डॉ. बापूसाहेब काळदाते

शब्दांकन : उषापति भास्कर

डॉ. बापूसाहेब काळदाते औरंगाबादला असल्याचं कळलं म्हणून भेटीस गेलो. समाजवादी नेते सर्वश्री मधु दंडवते, पन्नालालजी सुराणा आणि वसंतराव उपाध्ये थोड्या वेळापूर्वीच बापूसाहेबांना भेटण्यासाठी येऊन गेले होते. या तिघांची भेट झाली नाही, याबद्दल मला नाही म्हटलं तरी थोडी खंत वाटलीच.

: बापूसाहेब, कित्येक वर्षे विधानसभा तुम्ही गाजवलीत. आज तुम्हाला एकटे एकटे वाटत असेल नाही ?

: खूपच ! सध्या मी तसा मोकळाच परंतु असा हा आजारी. विविध पक्ष-कार्यकर्ते, विधानसभा आणि वि. परिषद यांतील आमदार मित्र, मंत्रीस्नेही, माननीय मुख्यमंत्री इथे आले की प्रकृतीची चौकशी करण्यासाठी आवर्जून येतात.

: तुम्ही विधानसभेत नाही, याची अनेक सुशिक्षितांना खंत वाटते — सरकारलाही वाटत असावी.

: थोडसं खरं आहे ते. समक्ष भेट झाली की संबंधितांच्या कानावर माझे मनोगत टाकतो. ते ऐकतात. करता येईल तेवढे करतातही.

: महाराष्ट्रातील सध्याचा दुष्काळ...

: पुष्कळसा वाचलाय, खूप ऐकलाय, थोडाफार पाहिलाय.

: एकूण परिस्थिती ?

: फारच भयंकर, भयानक !

: उपाय ?

: खूप उशीर झालाय्. तरीही दुष्काळावर मात करणे शक्य आहे. यासाठी राज्य सरकार, केंद्र सरकार आणि महाराष्ट्रातील उत्स्फूर्तपणे कार्य करणाऱ्या संस्था समर्थ आहेत.

: सरकारचे काही चुकतंय् ?

: फारच.

: कसे ?

: 'तहान लागली की आड खणायचा' ही म्हण सरकारच्या बाबतीत पूर्ण लागू पडते. दुष्काळाने रौद्र रूप धारण केल्यावर विहिरी खणण्याचा

धडक कार्यक्रम सरकार जाहीर करतंय् !

: दुष्काळी कामे सध्या खूप वेगात आहेत.

: तेच तर. दुष्काळी कामांची जिकडे तिकडे एकच भाऊगर्दी उडवून दिलेली आहे.

: जनता ?

: जनतेने दुष्काळ स्थितीशी मुकाबला करायचे सर्वशक्तिनिशी – अगदी प्राण पणाला लावून – ठरविलेले आहे. सरकारचे मात्र माहीत नाही.

: 'दुष्काळ हे आव्हान आहे!' असं नेहमी ऐकू येतं.

: बरोबर आहे. संकटातच माणसांची खरी पारख होते.

: विश्वविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून आपली काय अपेक्षा आहे ?

: स्वातंत्र्योत्तर काळात शेकडो गरीब विद्यार्थी देखील शिकू लागले. त्यांच्यातील कित्येक आज दुष्काळग्रस्त आहेत. त्यांनी आपल्या घरच्या लोकांना मदत करावी. जे दुष्काळग्रस्त नाहीत त्यांना आपल्या मित्रांना, विविध प्रकारची मदत करता येईल.

: उदाहरणार्थ ?

: खडी फोडण्याचे काम सर्वत्र चालू आहे. तेथील कष्टकऱ्यांचे काम मोजण्याकरिता मदत करता येईल. वैद्यकीय विद्यार्थी तेथे जाऊन औषधोपचार करू शकतील. मजुरी मिळण्याबाबत काही गैरप्रकार असतील तर दूर करणे, लोकांच्या पाठिशी उभे राहणे, त्यांना दिलासा देणे! सरकारी कामातही मदत करायला हरकत नाही.

: महिला मंडळासाठी काय कार्यक्रम ?

: दुष्काळी कामावरील मजूर, स्त्रीपुरुष व त्यांची बालके यांच्यासाठी खूप काही करता येईल. वृद्ध आणि मुले यांच्याकरिता सावलीसाठी निवारा बांधणे, गरोदर स्त्रियांना औषध, खाद्य, कपडे, आंथरूणपांघरूण पुरविणे. उदा. जालना रस्त्यावरील सटाणा खडीकेंद्र. औरंगाबादचे डॉक्टर्स व महिलामंडळीसदस्य आठवड्यातून दोनदा–रविवारी, बुधवारी–तेथे जाऊन नऊशे लोकांना सकस सातूचे पीठ देतात. वैद्यकीय तपासणी करून औषध देतात.

सेवाभावी महिला मंडळींना सरकारने विश्वासात घ्यावे. संकटातील अज्ञात लोकांसाठी मदत करण्यापेक्षा आजूबाजूस प्रत्यक्ष दिसणाऱ्या दुष्काळग्रस्तांविषयी चटकन् सहानुभूती वाटणे हा मनुष्यस्वभाव आहे. हे मानसशास्त्र सरकार लक्षातच घेत नाही.

: त्याचा परिणाम ?

: स्थानिक नेतृत्वाला आवाहन करण्यात फार मोठा फायदा होतो, तो सध्या होत नाही. जनशक्तीला अशा रीतीने तटस्थतेची भूमिका करू देणे अगदी अयोग्य आहे. सगळे श्रेय स्वतःच घेण्याचा खटाटोप सरकार करतेय्.

: दुष्काळाचे दुष्परिणाम ?

: दुष्परिणामांची काळजी वाटते त्यापेक्षाही या संधीचा फायदा घेण्याची जी दुष्ट प्रवृत्ती वाढते आहे, तिचा संताप येतो. खोटया हजेऱ्या भरून पैसा

हडप करणे तर सर्रास आणि सर्व ठिकाणी चालू आहे. बॅ. रजनी पटेलांच्या ' फिरत्या वैद्यकीय पथका 'विषयी तुम्ही वाचताय् ना ? स्थानिक डॉक्टर संघटनांना औषधे पुरवून सरकार त्यांची सक्रीय मदत का घेत नाही ?

: लोकवृत्तीतील इतर फरक ?

: दोघांच्याही—म्हणजे देणाऱ्यांच्या व घेणाऱ्यांच्याही—प्रवृत्तीत फरक पडतोय. देणारा म्हणतोय, मी उपकार करतोय (याला सरकारसुद्धा अपवाद नाही ! ) घेणारा अजूनही स्वाभिमानापेक्षा लाचारीने मागतानाच दिसतोय ! या सगळ्या दुःखद प्रसंगातून पुरुषार्थाला आवाहन आणि आव्हान मिळायला हवे.

: दुष्काळी कामांच्या प्रकाराविषयी?

: 'नागपूर प्लॅन' आहे, त्यात १९८१ पर्यंत महाराष्ट्रातील सडका आणि रस्ते याविषयी विवेचन आहे. पण सरकार म्हणतेय, त्यातील फार मोठे कार्य आजपर्यंत पार पडलेले आहे. दुष्काळ आला की खडी फोडायची ही अगदी इंग्रजकाळापासूनची स्थिती !

: मग काय करायला हवे ?

: 'वसंत बंधारा' म्हणून एक फॅड महाराष्ट्रात होऊन गेले. लाखो रुपये त्यावर खर्च झाले. आज शंभरातले दहा बंधारेसुद्धा जिवंत नाहीत. 'तीन गावात एक नळ' हा नारा सरकार आज देतेय्. पण दुष्काळ काही आजच आकाशातून टपकलेला नाही. तीन वर्षांपासून आहे. तेव्हा सरकार काय झोपले होते का ? निसर्गाने दुष्काळ आणला आहे तसाच सरकारनेही आणला आहे. योजकताशून्यपणे सर्व कामे चालली आहेत. सखोल विचारच नाही.

: कसे ?

: रोड रोलर नाही म्हणून आमचे इंजिनिअर हात जोडून स्वस्थ उभे ! जेव्हा वसंतरावजी सांगतात की, वऱ्हाडातली 'इनामी तळी' बैलगाड्या फिरवून पक्की करण्यात आली, त्यानंतर हे प्रयोग करून पाहतात ! जवळच्या साधनसामग्रीचा योग्य तो वापर करण्याची, सरकारी यंत्रणेतील एकाचीही इच्छा नाही, वृत्ती नाही. मफतलाल शेट सर्व दुष्काळग्रस्तांना सुकडी वाटणार म्हणे. सरकारजवळ एवढी यंत्रणा आहे ? सगळे स्वतःच करू पाहण्याची वृत्ती यावेळी तरी सरकारने सोडली पाहिजे. 'मध्यवर्ती दुष्काळ निवारण समिती' मुंबईला स्थापन करण्यात आली आहे. रिपब्लिकन, कम्युनिस्ट वा सोशॅलिस्ट या पक्षांच्या लोकांचे सरकारला का एवढे वावडे ? ते काय जनतेचे प्रतिनिधी नाहीत ? पक्ष कितीही किरकोळ असो. एकेक माणूस घेतला पाहिजे. तसेच तज्ज्ञांबद्दल. नानासाहेब गोरे, एस. एम. जोशी किंवा अर्थशास्त्रज्ञ वि. म. दांडेकर यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घ्यायला सरकारला लाज वाटते, संकोच वाटतो की कमीपणा ? सरकारने इतकी अनुदारता दाखवू नये.

: सध्याचे प्रयत्न कसे वाटतात ?

: केंद्र आणि राज्य सरकारांनी या दुष्काळाची दखल एरव्हीपेक्षा गांभीर्याने

पृष्ठ १२ वर

शतपावली

# एका सायंताऱ्याचं चांदणं

रवींद्र पिंगे

एकापेक्षा एक मारडाला भावगीतं गाऊन श्री. गजानन वाटव्यांनी महाराष्ट्रातल्या एका अख्ख्या पिढीवर गारूड केलेलं होतं हा इतिहास आता बदलता येणार नाही. काळाचा एक तुकडा वाटव्यांच्या नावावर मोडतो हे सत्य आहे. त्याची डूब कालांतराने फिक्कट होईलच, कारण काळ यच्चयावत सर्वांचाच नक्षा उतरवीत असतो. वाटव्यांचे देवही त्याला अपवाद नाहीत. मात्र आखून घेतलेल्या क्षेत्रातल्या वाटव्यांच्या पराक्रमाच्या खूणा मुद्देमालासह पुसल्या जाणार नाहीत इतका स्वधर्म त्यांनी आपल्या गळयातल्या कलेला प्राप्त करून दिला होता. वाटवे जिंकले; वाटव्यांची ढोबळ नक्कल करणारे हरले, हासुद्धा इतिहासाचाच डोळे वटारून दाखवणारा दाखला आहे. तारुण्याकडे झेपावणारे, तरुण असलेले आणि तारुण्य ओसरलेले, अशा तिन्ही थाटांच्या लुब्ध रसिकांचे तांडे वाटव्यांच्या फुकटंफाकटी ऐकायला मिळणाऱ्या कार्यक्रमांच्या जागी वर्षो न् वर्षं रंगत असत. आता वाटव्यांच्या अंगणातली उन्हं उतरली आहेत. ज्याच्या बळावर कलावंताच्या उमेदीचा उफाडा शाबूत रहातो त्या कौतुकाच्या किरणांतली ऊब आता निमाली आहे. जीवनभाष्य करणाऱ्या गीतकारांची, आपल्या चालींची चाकोरी न होऊ देण्याबाबत दक्ष असलेल्या गुणी स्वररचनाकारांची, दमदार गळेवाल्यांची आणि तिकीट काढून गीतगायन ऐकण्यात स्टेटस् सिंबॉल शोधणाऱ्या सधन श्रोत्यांची नवी पिढी गावात आता उभी राहिलेली आहे. 'गगनी उगवला सायंतारा' हे गजाननराव वाटव्यांनी लिहिलेलं आत्मचरित्र हा त्यांनी ह्या नव्या जगासमोर 'कालाय तस्मै नमः' करून वाचलेला आपल्या प्राक्तनाचा संक्षिप्त पाढा आहे.

ज्याला आपण गीतगायन म्हणतो त्या कलेचा मराठी मुलखातला श्रीकार केशवराव भोळे यांनी टाकला. जी. एन. जोशी, ज्योत्स्ना भोळे, जे. एल. रानडे श्यामला माझगावकर, संजीवनी मराठे ह्यांनी मराठी भावगीत गायनाचं पर्व त्यानंतर सुरू केलं. वाटवे हे त्यांच्या नंतरच्या काळातले. वेदशाळेत धर्मकृत्यांची वृत्ती शिकून घेऊन पुढे जन्मभर भिक्षुकी करण्यातली विटंबना टळावी म्हणून बेळगावहून चौदाव्या वर्षी पळून वाटवे एकाकी कफल्लक अवस्थेत पुण्याला येऊन थडकले. बेळगावला विष्णुबुवा उत्तुरकरांपाशी त्यांनी शास्त्रोक्त संगीताचे धडे गिरव-

लेले होते. पुण्यात आल्यावर गोपाळ गायन समाजात ते नवी विद्या घोटू लागले. पोटासाठी माधुकरी मागणं त्यांना क्रमप्राप्तच होतं. येरवड्याच्या बंदिखान्यात उपोषणाला बसलेल्या गांधीजींना त्यांनी ह्याच गायन समाजातर्फे प्रार्थनागीतं ऐकवली; पं. ओंकारनाथ ठाकुरांचा आशीर्वाद मिळवला. ही सगळी उमेदवारीच होती नि ती त्यांना करावीच लागली. पण शास्त्रोक्त गानविद्येचं काय ? ती मनासारखी त्यांना मिळालीच नाही. वाटवे लिहितात, 'या तपस्येचं फळ मला मिळेनासं झालं. गायकी शिकायची माझी इच्छा सफल झालीच नाही....माझं माधुकरीचं अन्न फक्त उदरभरणासाठी वापरलं जाऊ लागलं. त्यातून विद्येचं अमृत मला मिळेनासं झालं. सारे कष्ट फुकट जाऊ लागले. माझी तहान तृप्त झालीच नाही.' ती विद्या तिथेच संपली आणि वाटवे केवळ योगायोगाने कवितेकडे वळले. माधव ज्युलियनांची एक कविता त्यांच्या हातात आपसुख आली. त्यांनी तिला स्वतःच्या बुद्धीने चाल लावली. जणू एक नवीच विद्या त्यांना प्राप्त झाली, एक नवीच वेल त्यांच्या बागेत उगवली. मग अनिल, गिरीश, मायदेव, तांबे, यशवंत यांच्या कवितांना त्यांनी दिलचस्प चाली लावल्या. ही नव्या विद्येची मशागतच होती. पुढे योगायोगाने ते कर्वे कॉलेजमधल्या मुलींना गाणं शिकवायला जाऊ लागले. ह्या शिकवण्यातून त्यांच्यातला भावगीतगायक जन्मला. तेव्हापासून ते थेट आजपर्यंत, म्हणजे जवळ जवळ तब्बल तीन तपं वाटवे भावगीत गायन करीत आलेले आहेत. ह्या तीन तपांच्या झिजण्यातली गोळाबेरीज म्हणजे हे पन्नाशी ओलांडल्यावर त्यांनी लिहिलेले आटोपशीर आत्मचरित्र.

कलावंताला उमेदवारी कशी चिकाटीने करावी लागते त्याचा वाटव्यांनी काढलेला हा अनलंकृत आलेख सध्या उमेदवारी करता करता धाप लागलेल्यांना दिलासा देईल. कारण तो मनोज्ञ आहे. योगायोगाचं मानवी आयुष्यातलं महत्त्वही पुन्हा एकदा पटावं अशी त्यांची चरित्रकथा आहे. 'अभिनव संगीतपटु श्री. पवार' नावाचे कुणी एक गायक 'कोणता मानू चंद्रमा' हे गीत पुण्यात गाताना वाटव्यांनी ऐकले. त्यानंतर महत्प्रयासांनी त्यांनी त्या कवितेचे शब्द मिळवले. मग ती कविता ते रेशमी चालीवर गाऊ लागले. योगायोगाने वाटेत आलेल्या ह्या टप्प्यापासून मराठी कवितांचं भावगर्भ गायन करणारे कलावंत ही वाटव्यांची इयत्ता ठरून गेली. कीर्ती आणि आयुष्याची चव वर्धमान करणारे असे अनेक योगायोग वाटव्यांनी अतिशय तल्लीनतेने आपल्या आत्मकथेत वर्णन केले आहेत. त्यांना आलेले माणसांचे अनुभवही चमत्कारीक, परंतु गहीरे आहेत. जन्मदाते आई-वडील, सुधीर फडके, सोहनी वगैरे स्नेहीमंडळी, ह्यांच्या व्यक्तिरेखा जिवंत झाल्या आहेत. आपला दुसरा संसार नीट रांगेला लागण्याच्या अगोदरच्या पर्वात त्यांच्या जीवनात डोकाव-

-लेल्या अस्थीर स्त्रीयांचे अनुभवही त्यांनी त्यांच्या पडदानशीन पद्धतीने सांगितले आहेत. त्या त्या व्यक्तींची, विशेषता केवळ नव्या नव्या अनुभवांच्या पातळीवरलं भावजीवन रुचिसंपन्न करणाऱ्या स्त्रीयांची नावगाव देण्याचं त्यांनी टाळलेलं आहे. मात्र वाटवे रूटीन चाकरमान्यांच्या मानाने बरचसं बेलगाम जीणं जगले हे ते ज्या एका परित्यक्तेबरोबर जडलेल्या सहजीवनाचे त्रोटक चित्रण करतात त्यावरून कळू शकतं. अटळपणे उध्वस्त झालेल्या त्यांच्या पहिल्या संसाराच्या पार्श्वभूमी-वर सध्याच्या दुसऱ्या तृप्त संसाराचं चित्र चांगलंच उठून दिसतं. मात्र ह्या आत्मचरित्राचा अलौकिक नसलेला धोपटमार्गी उत्तरार्ध अधिकृत अहवाला-सारखा त्रोटक आणि रसनिर्मितीच्या बाबतीत भाकड झाला आहे. कदाचित, औचित्याच्या ढोबळ कल्पनांनी वाटव्यांना गुरफटून टाकलं असेल. जे जसं तन्मयतेने जगेन, ते तसंच बिन-दिक्कत लिहीन, ही कलावंत लेखकांना शोभा आणणारी धारणा वाटव्यांजवळ नसेल. कदाचित, तळ्यातले मासे मिळवून झाले आहेतच तर आता शांत झालेलं पाणी निष्कारण कशाला ढहुळा, असाही विवेक त्यांनी केला असेल. काही का कारण असेना, पुस्तकाच्या उत्तरार्धात लेखक फारच दबलेला वाटतो हे सत्य उरतंच. त्यांच्या हातात हात घालून फिरणारी त्यांची कुणी धनवान शिष्या, सांगलीची ती अशीच कुणी सुधारक मतांची निटनेटकी तरुणी, त्यांचा मित्रमैत्रिणींचा कलास्वादी परिवार, हा सगळा भाग मूळातले रंग शाबूत ठेऊन धिटाईने लिहीला गेला असता तर ही आत्मकथा कलात्मतेच्या पातळीवर गेलीही असती. पण तंतोतंत लिहिण्याच्या आड आपल्याला समजू शकणारी भीती वाटव्यांच्या मनात ऐनवेळी उभी राहीलेली दिसते. हाच कलावंत आणि कलावंत लेखक ह्यांच्या-तला काटेकोर फरक आहे. वाटव्यांना आलेल्या स्त्रीविषयक अनुभवांसारखे बाह्यता चोरटे पण अंतस्थत: दिलासे-दार मिष्ट अनुभव कुठल्या कलावंताला अगर कलावंत लेखकाला आलेले नाहीत? शिवाय, कलावंताच्या खासगी वैयक्तिक चारित्र्याची आणि त्याच्या रेशमी कलागुणांची गल्लत आता सुजाण रसिक निदान चारचौघात तरी अजिबात करीत नाहीत. बेफाम बेवडेबाजी आणि विकृत कामतृष्णापूर्ती हे टोकाचे दोन दुर्गुण वजा केले, तर कलावंतांनी केलेल्या इतर षौकाकडे आपल्या समाजात सामाजिक संदर्भात उचित अशा उदार नजरेने आजकाल पाहिलं जात आहे. सख:स्त आप्तजन अर्थातच ह्याला अपवाद असतात आणि माणसाला, मग भले तो आभाळाएवढा मोठा कलावंत असला तरीही अखेर आपल्या आप्तजनातच पाय रोवायचे असल्यामुळे त्याला कदाचित संपूर्ण सत्य बेदिक्कतपणे सांगता येत नसेल. हे सर्व बांधबांधारे ओलांडणं सर्वांच्याच आवाक्यात नि रक्तातही नसतं. वाटवे ह्यातलेच असावेत. त्यात त्यांचा दोष

नाही. मात्र जाताजाता सांगितलं पाहिजे की, कलावंतांच्या विशुद्ध चारित्र्याचा महिमा गाण्याचे दिवस पं. विष्णु दिगंबर पलुस्करांच्याबरोबरच सुखेनैव संपले आहेत.

'गगनी उगवला सायंतारा' ह्या वाटव्यांच्या आत्मकथेचा मोठा गुण असा की, आता आपला कीर्तिसूर्य अस्ताला चालला आहे, ह्याचे डोळस भान त्यांनी दाखवले आहे. कारुण्याचं आणि कलावंताला हमेशा गाठणारं एकाकीपणाचं खिन्न चांदणं आत्मकथेच्या ह्या शेवटच्या भागावर पडलेलं आहे. अस्त अटळ असतो. वाटव्यांचा शोभादायक विशेष हा की, अस्ताकडे पावले टाकीत असताना त्यांनी कुठेही आक्रस्ताळेपणा दाखविलेला नाही. उलट, तृप्त संसाराच्या अंगणात उभं राहून त्यांनी सामोऱ्या आलेल्या नव्या पर्वाला आणि कलावंतांच्या नव्या ढंगदार पिढीला 'सुस्वागतम्' म्हटलं आहे. कलावंताला काय भोगावं लागतं, काय लुटावं लागतं, काय जिंकावं लागतं आणि आपली खेळी खेळून झाली की, वाळलेल्या पानासारखं बाजूलाही कसं अलगद पडावं लागतं, त्याचा वाटव्यांचं आत्मचरित्र हा एक भला मोठा रंजक किस्सा आहे. ● ● ●

---

## डॉ. बापूसाहेब काळदाते यांची मुलाखत : पृष्ठ ८ वरून

घेतली, हे खरे, परंतु 'बर्वे कमिशन'ने पाटाच्या पाण्याचा आराखडा (इरिगेशन मास्टर प्लॅन) सरकारला सादर केला होता, त्यात चक्क म्हटले आहे की, फक्त चोवीस टक्के जमीन पाण्याखालची आहे. पाणीपुरवठ्याबाबत यापूर्वीच गंभीर दखल घ्यायला हवी होती.

'एक दिलाने झटा' हा असाच एक फसवा नारा. 'कष्ट तुमचे श्रेय आमचे', 'झटा तुम्ही, दिल आमचे' असे सरकारचे धोरण. तरीही अनेक स्थानिक संस्था, विरोधी पक्ष आपापल्या परीने स्वयंप्रेरणेने प्रयत्न करीतच आहेत. सरकार मात्र त्यांना विश्वासात घ्यायला तयार नाही.

सरकार सर्वप्रथम मोठ्या शेतकऱ्यांचा विचार करते. शेतमजूर वा गरीब शेतकरी यांच्या स्थितीचा, परिस्थितीचा विचार करायला सरकारला नेहमीच उशीर लागतो! एकूण काय, की, सरकारचे दुष्काळाबाबतचे कार्य सुसंवादी नाही.

: पुढे काय ?

: घनदाट काळोख. फेब्रुवारी ते जूनपर्यंतचा काळ यापेक्षाही भयानक. सध्या भूकबळी आहेत, लवकरच तहानबळीही पडू लागतील. शहरवासियांनी पाणी जपून वापरायला शिकले पाहिजे.

'भाषणाची परवानगी नाही. संभाषणाची मात्र आहे!' हा कच्चा धागा पकडून मी डॉ. बापूसाहेब काळदाते यांच्याकडून खूपच ऐकले. तेही रंगले होते. आपण प्रत्यक्ष काही करू शकत नाही, ही खंत त्यांच्या शब्दाशब्दांतून व्यक्त होत होती.

ते बरे होऊन लवकरच कार्य करू लागावेत अशी सदिच्छा व्यक्त करून मी त्यांचा निरोप घेतला. ● ● ●

# आ ले पा क

■ मुंबई पालिकेने आयोजिलेल्या सत्कारप्रसंगी भाषण करताना सुधीर फडके म्हणाले : मराठी चित्रपट चांगले असोत वा नसोत, प्रत्येक मराठी माणसाने प्रत्येक मराठी चित्रपट किमान एकदा तरी पहावा.

मराठी माणूस हा निधड्या छातीचा असतो हे खरे; पण म्हणून काय त्याला वाटेल ते करायला सांगायचे ?

■ राज्यसभेत दुष्काळाच्या संदर्भात झालेल्या चर्चेच्या ओघात एका सभासदाने म्हैसूरमधील धरणफुटीचा उल्लेख करून रागारागाने असे विचारले की, लक्षावधी रुपये खर्चून तयार झालेली धरणे फुटतात तरी कशी ?

फुटण्याअगोदर ती मुळात उभीच कशी राहतात, असा प्रश्न मला पडलेला आहे.

■ 'दो चोर' हे दिग्दर्शक पद्मनाभ बांदोडकरांचे पहिलेच चित्र. ते एका मुलाखतीत म्हणतात : पैसा किंवा ग्लॅमर यांच्या आकर्षणाने मी चित्रपटक्षेत्रात आलेलो नाही.

हे 'क्षेत्र'च असे आहे की, येथे येणारा कोणीही त्या आकर्षणाने येत नाही. वत्सा पद्मनाभा, तुजप्रत कल्याण असो !

■ एका अग्रलेखात म्हटले आहे : शास्त्रज्ञांची वाढती बेकारी ही जरी वस्तुस्थिती असली तरी सर्वच बेकार शास्त्रज्ञ तज्ज्ञ आहेत असे मानण्याचे कारण नाही.

एकदम कबूल. ते बेकार आहेत एवढे मानलेत तरी पुष्कळ झाले.

■ सोव्हिएत रशियाचे वीरपुरुष मार्शल ग्रेचको यांनी नुकतीच फ्रान्सला भेट दिली. त्या वेळी फ्रेंच शांपेनची चव घेतल्यावर ते म्हणाले : फ्रेंच शांपेन म्हणजे पुळकवणी; त्यापेक्षा चहा बरा.

अस्सल आणि कट्टर चहाबाजाला तुलनेसाठीसुद्धा दुसऱ्या कोणत्याही पेयाचा उल्लेख चहाबरोबर केलेला चालणार नाही.

■ रविवारच्या 'नवाकाळ'मध्ये चंद्रकांत पुरंदरे लिहितात : लुंगी-कुडत्यांचा आणि तंग पँटींचा सध्या जमाना आहे; मुलींचा पोषाख मुलांनी करावा तर मुलांचा पोषाख मुलींनी करावा असा आहे. एकदा तर चक्क स्त्रीदाक्षिण्य म्हणून बसमध्ये मी एका मुलालाच बसायला जागा दिली होती.

हा कर्मयोग असाच चालू ठेवा; कधीतरी फळ मिळाल्याशिवाय रहायचे नाही.

■ गो. नी. दांडेकरांनी सांगितले : हिमालयापेक्षाही मी सह्याद्रि जास्त महत्त्वाचा मानतो.

आमचा महाराष्ट्राभिमान गो. नीं.-पेक्षा सवाई आहे. त्यामुळे गौरीशंकर-पेक्षाही कळसूबाई जास्त उंच आहे, असे आम्ही मानतो.

■ दांडेकरांनी पुढे सांगितले : मी रायगड शंभर वेळा पाहिला तरीही तो पूर्ण पाहिला असे मला वाटत नाही.

पहाणारा पूर्ण असला की जे पहायचे ते पूर्ण दिसत नाही !

■ एक शिक्षणतज्ज्ञ लिहितात : शिक्षण घेणारा तरुण पुस्तक व परीक्षा यात गुंतलेला असतो.

छे हो. यात तो फक्त असतो; वर्गा-तल्या सगळ्यात सुंदर दिसणाऱ्या मुलीत तो गुंतलेला असतो.

■ हेच तज्ज्ञ पुढे लिहितात : सध्या शाळात शिक्षक बोलत असतात आणि मुले बसून ऐकत असतात.

छे छे, मुलेदेखील बोलतच असतात.

■ चित्रपटसृष्टीतील पन्नास वर्षांच्या नाबाद कारकीर्दीबद्दल मुंबई महा-पालिकेने व्ही. शांतारामांचा सत्कार केला. त्या प्रसंगी शांतारामबापूंनी सांगितले : माझ्या चित्रपटांच्या माध्यमातून मी समाजाची आणि देशाची सेवा करत आलो आहे.

त्यापेक्षा त्या माध्यमातून तुम्ही फक्त चित्रपटकलेचीच सेवा केली असती तर– !

■ माणूस तिरळा असला तरी त्याची दृष्टी सरळ असू शकते. ◻

## नाना फडणीसांची उंची

जोनाथन स्विफ्टचे ‘गलिव्हर्स ट्रॅव्हल्स’ हे पुस्तक बहुतेकांनी वाचलेले असेल. आणि वाचलेले नसेल तरी तूर्तास काही बिघडत नाही कारण गलिव्हरची गोष्ट तरी सगळ्यांना ठाऊक असते–असायला हवी. स्विफ्टच्या या जगद्विख्यात गोष्टीबद्दल एक बावळट गैरसमज असा आहे की ही गोष्ट लहान मुलांसाठी आहे. लहान-पणीच ती वाचावी आणि त्या कल्पित, अद्‌भुतरम्य विश्वात रमून जावे हे खरे नव्हे. एक तर स्विफ्टच्या संपूर्ण गोष्टीत असा भाग कितीतरी आहे की जो ‘मुलांसाठी’ नाही आणि दुसरे म्हणजे ती गोष्ट ‘अदभुत’ नाही; वास्तव आहे. तिची मांडणी अदभुत असेल; पण तिचा सूचित आशय वास्तविक आहे. तुमच्यामाझ्याएवढा गलिव्हर खुज्या माणसांच्या देशात जातो तेव्हा त्यांना तो महाकाय भासतो; आणि दैववशात जेव्हा तो महाकाय माणसांच्या देशात जातो तेव्हा त्यांना तो फार खुजा वाटतो. प्रत्येक माणसाची अवस्था गलिव्हरसारखीच असते : भोवतालच्या लहान माणसात तो मोठा भासतो;

आणि भोवताली मोठी माणसे असली की तोच माणूस खुजा ठरतो. मूल्यांची ही सापेक्षता स्विफ्टने गलिव्हरच्या गोष्टीत केवढ्या प्रभावीपणाने साकार केली आहे !

गलिव्हरच्या गोष्टीची आम्हाला आठवण झाली आणि तुम्हाला ती करून द्यावीशी वाटली. कारण परवा असाच कांहीसा प्रकार एका नव्या नाटकात आम्हाला पाहायला मिळाला. हे नाटक म्हणजे विजय तेंडुलकरांचे 'घाशीराम कोतवाल'. या नाटकात नाना फडणीसांची आणि ब्राह्मणवर्गाची टिंगल, निंदानालस्ती आहे असा बभ्रा होऊ लागला आहे. (हेच वेगळ्या शब्दांत सांगायचे तर हे नाटक गाजायवाजायला लागले आहे. काय या तेंडुलकरांचे सद्भाग्य आहे पाहा : लिहिले नाटक की गाजलेच. आपल्याला बुवा तेंडुलकरांचा नुसता हेवा नाही, मत्सरसुद्धा वाटतो). या नाटकात खरे काय आहे, त्याची चिकित्सा, करणारे करतील, आणि वाचणारे वाचतील–न वाचतील. मी आपला तुम्हाला या नाटकाच्या प्रयोगातील छोटीशी गंमत सांगणार आहे.

'घाशीराम कोतवाल' या नाटकाच्या प्रयोगात रंगमंचावर केवढे तरी ब्राह्मण दिसतात. अस्ताला चाललेल्या पेशवाईचे प्रतिनिधित्व करणारे हे ब्राह्मण. सगळ्या सर्वसाधारण उंचीच्या ब्राह्मणांच्या मेळाव्यात एक ब्राह्मण तेवढा खुजा आहे. या ब्राह्मणांच्या सामूहिक हालचाली मोठ्या वेधक आहेत. रंगमंचावर त्यांनी पदन्यासित केलेल्या आकृतींना रेखीव डौल आहे. त्यामध्ये हा बुटबैंगण ब्राह्मण वेगळा जाणवतो. सगळ्या सारखेपणाला ते वेगळे खुजेपण मोठा चमत्कारिक व गमतीदार छेद देते.

नाटक पाहताना पुढे असे जाणवू लागले की त्या बुटक्याला नाटकाच्या आशयाविष्कारात अर्थपूर्ण स्थान आहे. आपल्या एकट्याच्या खुजेपणाने बरोबरच्या ब्राह्मणांच्या उंचीतील आभासिकत्व तो स्पष्ट करतो; नाना फडणीसांचे 'अर्धा शहाणा' हे आख्यायिकांतर्गत वर्णन मनात जागे करतो; आणि नाटकाच्या अखेरीस जेव्हा नाना त्याच्या शेजारी उभे राहतात तेव्हा तर राजकारणधुरंधर नानांच्या सावधपणाची, शहाणपणाची, दूरदृष्टीची मर्यादा डोळेफाड जाहीर करतो — नानांच्या उंचीचे तोकडेपण आपल्यापुढे उभे करतो.

आता हा जो मी पॉईंट काढला आहे ना तो 'घाशीराम कोतवाल' नाटक पाहिलेल्या किती प्रेक्षकांना स्वत:चा स्वत:लाच उमगला असेल ते निश्चित सांगणे अवघड आहे. टीकाकारांना मात्र तो उमगलाच असणार. त्यांना न उमगणारे असे काय असू शकेल ?

—अनंतराव

नांदेडच्या तहसीलदाराचा खून ही हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील एक महत्त्वाची घटना. भविष्यात जेव्हा हैद्राबाद चळवळीचा समग्र इतिहास लिहिला जाईल तेव्हा इजळीच्या या वीरांना अग्रपूजेचा मान द्यावा लागेल.


ती घटना अशी...

# फाशीच्या दोरीला शिवून आलेले वीर

सुधाकर डोईफोडे

ती १९४७ सालातील फब्रुवारी महिन्याची १७ तारीख होती. हा महिना या भागात थंडी व उष्म्याच्या सीमेवरील महिना. एक दिवस थंडी पडते तर दुसरेच दिवशी उष्णता. १७ तारीख त्या दिवशी उष्णतेचा दिवस होता. नांदेडचं गच्च भरलेलं कोर्ट वारावारा करत होतं. या उदासवाण्या वातावरणातच एक अनामिक हुरहूर लोकांना बेचैन करीत होती. एका महत्त्वाच्या खटल्याचा निकाल आज जाहीर होणार होता. कोर्ट म्हटले की दररोज असे फैसले बाहेर येतातच. खूनाचा खटलाही मधून मधून असतोच. पण आजचा प्रकार वेगळा होता. हा खून खटला होता. पण त्याला राजकीय रंगही होता. हैद्राबाद मुक्ती चळवळीचा शुभारंभ असं त्याला इतिहासात पुढं म्हटलं जाईल असा तो खटला होता. जुलमी निजामी राजवटीचा प्रतिनिधी असलेल्या तहसीलदाराच्या खूनाबद्दल बंदी केलेल्या २२ जणांचे भवितव्य आज जाहीर होणार होते. या वीरांच्या शिक्षेचे इंधन प्राप्त होऊन, हैद्राबादच्या मुक्ततेच्या चळवळीची ज्वाला अधिक जोमाने तेवणार होती.

दुपारचे बारा वाजले. कोर्टाच्या इमारतीत व आवारात जमलेला जमाव अधीर झाला होता. या खटल्यासाठी औरंगाबादहून आलेले खास न्यायाधीश अजून आपल्या चेंबरमध्येच होते. आपल्या फैसल्यावरून ते शेवटचा हात फिरवीत होते. घड्याळाचा काटा पुढे सरकू लागला. लोक अस्वस्थ झाले होते. तेवढ्यात इजलासच्या बाजूला गडबड उडाली. पट्टेवाले आपले पट्टे सावरीत सावध झाले. पोलीस अधिकारी आपला लफ्फेदार फौजदारी फेटा सावरीत दक्ष



खटल्यातले प्रमुख आरोपी

झाले. होऽशीयारची ललकारी उठली. वकील, प्रेक्षक, आरोपी यांनी जज्जांना खडी तालीम दिली. कोर्ट स्थानापन्न झाले. त्यांनी डोळ्यावरील चष्मा काढून नीट पुसून पुन्हा डोळ्यावर ठेवला. हॉलमधील गर्दीकडं भेदक नजरेनं एकदा पाहिलं. त्यांची नजर पाहताच लोक चरकले. अशुभाची कल्पना मनाला चाटून गेली. जज्जांची करडी नजर, त्यांच्या अंतर्मनातील खळबळ आणि प्रक्षोभाला चिरडून टाकण्याच्या प्रयत्नाचं चिन्ह असल्याचं वाटत होतं. कोर्टाचे शिरस्तेदार उभे राहीले. सर्वांनी श्वास आवरून धरले. सर्व आरोपींना उभं करण्यात आलं. त्यांनी निकाल फर्मावण्यास सुरुवात केली. 'तुम्ही सर्व आरोपी क्रमांक १ ते २२ यांनी आपसात संगनमत करून नांदेडच्या तहसीलदारांना ठार मारण्याचा कट केला व तो अमलात आणल्याचं पुराव्यावरून सिद्ध झाले आहे. तहसीलदारासारखा या सल्तनतीचा सेवक आपला सरकारी फर्ज आदा करीत असताना तुम्ही त्याच्या कामात अडथळा आणला. लेव्ही देण्यास नकार देऊन राजद्रोहाचं कृत्य केलं आणि त्याचा तुम्ही सर्वांनी मिळून खून केला. हे शाबीत झाले आहे. तुमच्या गुन्ह्याबद्दल हैद्राबाद स्टेट पिनल कोडच्या तरतुदी अनुसार आरोपी नंबर १ ते ४ यांना सजाये मौत व

क्रमांक ५ ते २२ यांना उमरकैदेची सजा बहाल करण्यात येत आहे.'

सजेची सुनावणी संपली. टाकाचं नीब मोडून न्यायाधीश उठून आत गेले आणि प्रेक्षकात एकच कालवा उठला. आरोपींच्या नातेवाईकांनी, स्त्रियांनी रडण्याचा एकच गोंधळ माजवून दिला. पोलीस सावधान झाले. त्यांनी मुजरीम लोकांना दोन-दोनच्या रांगेत उभं करून बेड्या ठोकल्या अन जेलकडं चालविलं. आरोपीच्या चेहऱ्यांवर मात्र कोणतीही चलबिचल दिसत नव्हती. चेहरे एक प्रकारच्या निर्धाराने कठोर वाटत होते. परिणांमाची जाणीव ठेवून केलेले हे कृत्य होते. त्यात यापेक्षा वेगळी अपेक्षा ठेवून काय उपयोग !

नांदेडच्या तहसीलदाराचा खून ही हैद्राबाद मुक्ती चळवळीतील एक अत्यंत महत्त्वाची घटना. एका जुलमी राजवटीचा क्रूर प्रतिनिधी म्हणून हा तहसीलदार वावरत होता. प्रजेला पिडणं हे आपलं कर्तव्य आहे एवढंच ज्ञान असणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांचा तो आदर्श नमुना होता.जुलूम असह्य झाल्यानं रँडचा खून करणाऱ्या चाफेकरादी देशभक्तांत व या आरोपींत कोणताही फरक नव्हता. दुर्दैवाची गोष्ट अशी की, एवढे मोठे प्रकरण आज मितीस फारच थोडयांना ज्ञात आहे.

ही घटना १९४६ ची आहे. स्टेट काँग्रेसची चळवळ अद्याप सुरू झालेली नसली तरी कार्यकर्ते वातावरण तापवीत होते. आर्यसमाज, हिंदुमहासभा, यांचे प्रयत्न आपल्या परीनं चालू होते भारताचे स्वातंत्र्य निश्चित झाल्यानं निजाम रियासतीचं भवितव्य काय हा प्रश्न निर्माण झाला होता. बहुसंख्य प्रजेच्या इच्छेनुसार हैद्राबाद रियासत हिंदी संघराज्याला जोडावी अशी मागणी सुरू झाली होती. तत्पूर्वी जनमत स्पष्ट करून घेण्यासाठी (जिम्मेदारांना हुकमत) जबाबदार राज्यपद्धती स्थापन करावी अशी मागणी करण्यात येत होती. परंतु निजामी रियासत ही अल्लानं मुस्लीमांना दिलेली अनामत आहे, अशा समजुतीनं भारावलेले लोक या पाक-सल्तनतीची हिफाज्जत करण्यासाठी रझाकार दलात सामील होत होते. वातावरणाला परस्पर विरोधी ताण पडत होता. दुसरं महायुद्ध नुकतच संपलं होतं पण त्या युद्धापायी झालेली हानी भरून काढण्यासाठी इंग्रजसरकारनं लेव्ही रूपानं धान्य जमविणं सुरू केलं, त्याचीच आवृत्ती निजामानं काढली. फर्मानं सुटली अन् निजामाची सारी यंत्रणा लेव्ही जमविण्यासाठी तुटून पडली. लेव्हीतील खुशीची बाब केव्हाच नजरेआड झाली. आता केवळ लूटमार, जबरदस्ती एवढाच अर्थ त्याला उरला. शेतकऱ्याला पोटापुरती ज्वारी घरात उरली की नाही, हे न पाहता लेव्हीच्या नावाखाली जबरदस्तीनं त्यांची ज्वारी नेली जाऊ लागली. शेतकरी हैराण झाले. समाज असंघटीत, दाद मागण्याची सोय नाही. मुकाबला रानटी यत्रणेशी. अशा कचाट्यात ते सापडले. सरकारी अधि-

पृष्ठ ४७ वर

८ डिसेंबरपासून बनारस विद्यापीठ बेमुदत बंद आहे. बारा हजार विद्यार्थ्यांचं शिक्षण आज पूर्णत: थांबलेलं आहे. या मागचं कारण काय ?

श्रीकांत सिनकर यांनी आपल्या बनारस भेटीत विद्यापीठाच्या आवारात टाकलेला फेरफटका....

# बनारस हिंदू विश्वविद्यापीठ बंद का ?

बनारस हिंदू विश्वविद्यापीठ हे जगात तिसरा क्रमांक असलेले विद्यापीठ ८ डिसेंबरपासून बेमुदत बंद आहे, हे समजताच मला आश्चर्याचा मोठा धक्काच बसला आणि त्याच दिवसापासून मी या युनिव्हर्सिटीच्या पटांगणात भटकून युनिव्हर्सिटीचं खरं स्वरूप शोधण्याचा कसोशीने प्रयत्न करू लागलो. परंतु युनिव्हर्सिटीच भव्य पटांगण साक्षात ओस पडून तिथे पूर्णत: स्मशानशांतता नांदत असल्याचे मला जाणवले.

प्रत्यक्ष बनारसमध्ये मी अनेक कॉलेज विद्यार्थ्यांना बोलकं करण्याचा कसोशीने प्रयत्न केला होता. परंतु माझ्या अंगात 'गुरू शर्ट' आणि 'डबल बॅरॅल' पॅन्ट असूनही मी त्यांना 'इंटिलिजन्स ब्रँच' चा कुणी ऑफिसर वाटत होतो की काय कुणास ठाऊक! एकजण कुणी व्यवस्थितपणे तोंड उघडेल तर शपथ! तरीही काही विद्यार्थी आणि विद्यार्थीनींबरोबर स्वतंत्रपणे गप्पा मारून या विषयाची जी माहिती मला मिळाली, त्याचं सार थोडक्यात असं आहे :

...बनारस हिंदू विश्वविद्यापीठ या अद्यावत युनिव्हर्सिटीच्या अधिपत्याखाली जवळजवळ वीस महाविद्यालयं आहेत आणि ही सर्वच महाविद्यालयं युनिव्हर्सिटीच्या प्रशस्त परिसरात उभी आहेत. आज मितीस किमान बारा हजार विद्यार्थी देशाच्या आणि परदेशाच्या कानाकोपऱ्यातून शिक्षणार्थ

इथं आलेले आहेत. खुद्द उत्तर प्रदेशातील तीन ते चार हजार विद्यार्थीच महाविद्यालयीन शिक्षण घेत आहेत.

या विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांच्या एकूण दोन युनियन्स आहेत. यातील 'विद्यार्थी परिषद' या सर्वाधिक विद्यार्थी सदस्य असलेल्या युनियनमध्ये जनसंघाचा बराच प्रभाव आहे. याखेरीज सोशॅलिस्ट पार्टी, स्वतंत्र, कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी) आणि 'भाक्रांद' या पक्षांचाही अंतर्भाव या युनियनमध्ये आहेच.

दुसरी युनियन 'युवक काँग्रेस' (छात्र संघटण) या नावाने अस्तित्वात असून या युनियनमध्ये काँग्रेस पक्षाचा प्रभाव आहे आणि 'सी. पी. आय' चा या युनियनला भरपूर पाठिंबा आहे.

विद्यापीठाच्या चालू वर्षासाठी युनियनची जी निवडणूक झाली, त्या निवडणूकीचा निकाल असा लागला :

अध्यक्ष म्हणून निवडून आलेले श्री. हरिकेश बहादूर यांना सतराशे मते मिळाली. हा उमेदवार काँग्रेसप्रणित 'युवक काँग्रेस' ने उभा केलेला होता. सोशॅलिस्ट पार्टीने स्वतःच्या 'युवजन सभे' तर्फे महेंद्रनाथ नावाच्या एका विद्यार्थ्यास अध्यक्षीय निवडणूकीस उभे केलेले होते. परंतु त्याला जवळजवळ चवदाशे मतं मिळाली. खुद्द 'विद्यार्थी परिषदेच्या गोपालदत्त तिवारीस जेमतेम साडेतेराशेच मतं मिळाली. म्हणजेच निदान अध्यक्षीय निवडणूकीत काँग्रेसचा आणि पर्यायाने काँग्रेसप्रणित युनियनचा जोर झाला होता.

उपाध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह यांच्या निवडणूकीत मात्र विद्यार्थी परिषदेने भलताच जोर दाखवला. उपाध्यक्षदाच्या निवडणुकीत विद्यार्थी परिषदेचा उमेदवार महेंद्रनाथ सिंग दोन हजार अधिक मतांनी निवडून आला. या जागेसाठी काँग्रेस आणि सी. पी. आय. नेही आपआपले उमेदवार उभे केलेले होते. परंतु या दोन्ही उमेदवारांची विद्यार्थी परिषदेने निवडणूकीत अत्यंत केवीलवाणी अवस्था करून टाकली होती.

प्रमुख कार्यवाहच्या निवडणूकीत विद्यार्थी परिषदेचा प्रभु नारायण श्रीवास्तव हा दोन हजार मतांनी निवडून आला आणि याच जागेसाठी कम्युनिष्ट पार्टीच्या 'स्टुडन्ट फेडरेशन' ने उभ्या केलेल्या सुकांत चटर्जीचा विद्यार्थी परिषदेने निकाल लावून टाकला.

काँग्रेस आणि सी. पी. आय. प्रणीत युनियन विद्यापीठाकडे झुकणारी आहे, तर विद्यार्थीविरोधी कार्यक्रमाला सक्त विरोध करणारी जनसंघप्रणीत विद्यार्थी परिषद आहे. परंतु विद्यार्थ्यांची जी निवडणूक झाली त्या निवडणूकीत काँग्रेसचाच उमेदवार हरिकेश बहादूर निवडून आलेला आहे. इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे, ती ही की विद्यापीठाचे उपकुलगुरू श्री. कालुराम श्रीमाळी हे कट्टर काँग्रेसवादी आहेत. पंडित नेहरूंच्या काळात श्री. श्रीमाळी हे केंद्रीय शिक्षणमंत्री होते. परंतु 'कामराज योजने' खाली त्यांना

स्वत:ची जागा सोडावी लागलेली होती. साहजिकच उपकुलगुरू आणि युनियनचा अध्यक्ष एकाच पक्षाचे असल्यामुळे त्यांना विरोध करण्यासाठी जनसंघ, सोशॅलिस्ट पार्टी प्रभृती पक्ष येणं उघडच होतं.

या निवडणूकांपूर्वी 'विद्यार्थी परिषदे'चा प्रभाव वाढविणाऱ्या जवळजवळ तीस विद्यार्थ्यांना ते विद्यार्थ्यांना प्रक्षोभक करतात या सबबीवर खास कमिशन नेमून विद्यापीठातून काढून टाकण्यात आले होते. अर्थात हा विद्यार्थी परिषदेवर मोठाच वार होता. त्यामुळे साहजिकच विद्यार्थी परिषदेने तीव्र आंदोलनास सुरुवात केली. 'रस्टीकेट' केलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा विद्यापीठात प्रवेश द्या, या प्रमुख मागणीबरोबरच विद्यार्थ्यांनी आणखीन काही मागण्या उपकुलगुरूंकडे केल्या. 'इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या विद्यार्थ्यांना जशा ज्ञानशाखेप्रमाणे (Facility) सवलती मिळतात, तशाच सवलती इतर विद्यार्थ्यांनाही मिळाव्यात 'बार कौन्सील'च्या नियमानुसार अंमलात असलेली 'लॉ स्टूडंन्ट'ची 'अॅटेन्डन्स्'ची जी अट आहे, ती गैरसोयीची असल्यामुळे काढून टाका, (इतर ज्ञान शाखेत ही अट अस्तित्वात नाही.) 'हेड ऑफ डिपार्टमेन्ट'ची जागा आळीपाळीनुसार (Rotation) आहे, तो सर्वांसाठीच करावी, काही विशिष्ट व्यक्तीपुरतीच ती जागा ठेवू नये, अशा ठळक मागण्या विद्यार्थ्यांनी केलेल्या होत्या.

या मागण्यांच्या संदर्भात अध्यक्ष हरिकेश बहादूर हे उपकुलगुरूंबरोबर वारंवार चर्चा करीत होते. परंतु ही चर्चा केवळ एक 'फार्स' आहे, आपला अध्यक्ष उपकुलगुरूंना 'मिळालेला' आहे, अशी भावना विद्यार्थ्यांच्या मनात पेट घेत होती. अध्यक्ष प्रत्येक वेळी कोणती ना कोणती सबब पुढे करीत होते, आणि विद्यार्थ्यांचे आंदोलन हळूहळू भडकत होते.

६ किंवा ७ डिसेंबरला विद्यापीठाच्या आवारातच असलेल्या उपकुलगुरूंच्या निवासस्थानासमोर तीन ते चार हजार विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी उग्र निदर्शनं करीत होते. त्यावेळी अध्यक्ष हरिकेश बहादूर तिथे आले आणि 'आपल्या मागण्या विद्यापीठाने मान्य केल्या आहेत, आपण आज विजयोत्सव साजरा करू!' असं विद्यार्थ्यांना सांगू लागले. परंतु आपल्या अध्यक्षावर विश्वास ठेवायला विद्यार्थी तयार होत नव्हते. त्यांनी अध्यक्षांजवळ लेखी निवेदनाची मागणी केली, तसे हे अध्यक्ष गोंधळले, आणि लेखी निवेदन देण्याचे नाकारू लागले. तसे भडकलेले विद्यार्थी अधिकच उग्र निदर्शनं करू लागले.

विद्यापीठाच्या पटांगणात अशी स्फोटक परिस्थिती निर्माण झालेली असताना प्रत्यक्ष उपकुलगुरु त्यावेळी काय करीत होते? वाराणसीत असलेल्या 'हॉटेल क्लार्क' या ए ग्रेड 'पॉश' हॉटेलात उपकुलगुरु तेव्हा उत्तर प्रदेशच्या गव्हर्नरना खास खाना देत होते. वस्तूत: ही पार्टी उपकुलगुरूंच्या घरीच होणार होती. परंतु विद्यार्थ्यांच्या

भीतीमुळे ही पार्टी हॉटेल क्लार्कमध्ये आयोजित करण्यात आलेली होती.

उपकुलगुरु हॉटेल क्लार्कमध्ये आहेत हे समजताच विद्यार्थ्यांनी त्यांच्या निवासस्थानी बैठा सत्याग्रह सुरू केला. हॉटेल क्लार्कमध्ये उपकुलगुरूंना जेव्हा ही बातमी समजली तेव्हा त्यांनी तिथूनच बोलिसांना फोन केला, आणि विद्यापीठाच्या पटांगणात प्रवेश करण्यास त्यांनी पोलिस पार्टीस परवानगी दिली. ही परवानगी मिळताच आर्मड् पोलिस आणि फायर ब्रिगेड यांच्यासह स्थानिक पोलिसांच्या वॅगन्स् विद्यापीठाच्या पटांगणात शिरल्या. शस्त्रधारी पोलिसांच्या वॅगन्स् नजरेस पडताच विद्यार्थी अधिकच प्रक्षुब्ध झाले.

'यू मस्ट डिस्पर्स इमिजिएटली !' असं पोलिस अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना बजावून सांगितले. परंतु हा आदेश मानण्यास विद्यार्थी अर्थातच तयार नव्हते. पोलिसांनी विद्यार्थ्यांच्या दहाबरा नेत्यांना तडजोडीसाठी बाजूला बोलावले, आणि त्यांनाच अटक करून व्हॅनमध्ये कोंबले. या घटनेमुळे विद्यार्थ्यांचे आंदोलन स्फोटक रूप धारण करू लागले. विद्यार्थ्यांचा हा प्रचंड जमाव कोणत्याही क्षणी भडकून उठेल, याची पोलिस अधिकाऱ्यांना खात्री होतीच. विद्यार्थी जागचे हटत नाहीत, हे पाहून पोलिसांनी फायर ब्रिगेडच्या मदतीने आग विझविण्याच्या पाईपातून विद्यार्थ्यांवर पाण्याचा प्रचंड मारा केला. ही पहिली ठिणगी पडताच विद्यार्थी पिसाळले, आणि क्षणार्धात युद्धाला तोंड लागून पोलिसांवर बेफाम दगडफेक होऊ लागली. पोलिसांनी प्रथम लाठीमार आणि नंतर अश्रूधुराचा वापर करून विद्यापीठाच्या नयनरम्य पटांगणास युद्धक्षेत्राचे स्वरूप आणले. या झटापटीत किमान शंभर विद्यार्थी जखमी झाल्याचा दावा पुढे 'विद्यापीठ बचाव समिती'ने केलेला होता.

विद्यापीठाच्या पटांगणात एवढी धुमश्चक्री चालू असताना उपकुलगुरू 'भरल्या पोटाने' तिथे येऊन धडकले आणि त्यांनी लगेच 'आर्ट, स्पेशल सायन्स, आणि 'लॉ' या तीन शाखा पूर्णत: बंद केल्याचे घोषित केले. या तीन शाखाच बंद करण्याचे काय कारण होते ? पटांगणात जी दंगल झाली, त्या दंगलीस केवळ वरील तीन शाखांचेच विद्यार्थी कारणीभूत आहेत, असा त्यांचा ग्रह झालेला होता. या तीन शाखा बंद करून उपकुलगुरु गप्प बसले नाहीत, तर त्या त्या शाखांच्या विद्यार्थ्यांना त्यांनी हॉस्टेल सोडून जाण्याचा हुकूम दिला. तेही चोवीस तासाच्या आत ! पण यावेळी अध्यक्ष हरिकेश बहादूर कुठे होते ? विद्यापीठाच्या पटांगणात जसजशा पोलिस वॅगन्स घुसल्या, तसे हे अध्यक्ष मोठ्या शिताफीने अदृश्य झाले.

दुसऱ्या दिवशी हॉस्टेल सोडून जाण्यास विद्यार्थ्यांनी नकार दिला. अर्थात ही कल्पना उपकुलगुरू, स्थानिक पोलीस, पी. एस. सी. पोलीस, आर्मड पोलीस, आणि फायर ब्रिगेड अधिकाऱ्यांना होतीच. फायर ब्रिगेडनी तर विद्यापीठाच्या अद्यावत रसायनविभागा-

भोवती कडंच केलेलं होतं. कोणत्याही क्षणी संपूर्ण रसायनविभाग भस्मसात होण्याचो शक्यता निर्माण झालेली होती. भडकलेले विद्यार्थी रसायनविभाग भडकवून टाकण्याचा धोका फायर ब्रिगेड अधिकारी नाकारू शकत नव्हते.

आर्ट, सोशल सायन्स, आणि लॉ च्या विद्यार्थ्यांना हॉस्टेल सोडून जाण्याचा पुन्हा आदेश देण्यात आला. विद्यार्थ्यांनी हा आदेश झुगारताच साक्षात पोलीस फोर्स हॉस्टेलमध्ये घुसला आणि त्यांनी विद्यार्थ्यांचे सामान बाहेर फेकण्यास सुरुवात केली. त्याबरोबर विद्यार्थी बिथरले आणि पोलीस विरुद्ध विद्यार्थी असे हल्ले – प्रतिहल्ले होऊ लागले. तोपर्यंत उपरिनिर्दिष्ट तीन शाखांखेरीज विद्यापीठाचे सर्वच विद्यार्थी या आंदोलनात उतरले, त्याबरोबर पोलीस फोर्सही वाढविण्यात आला आणि फार मोठ्या प्रमाणात लाठीहल्ला करण्यात आला. विद्यार्थ्यांना हॉस्टेलमधून खेचून बाहेर काढण्यात येत होते. याहीपेक्षा धक्कादायक बाब अशी होती की, पोलिसांनी आपली घड्याळं, कॅमेरे, ट्रान्झिस्टर्स, पैशांची पाकीटं पळविल्याचा दावा अनेक विद्यार्थ्यांनी केला.

पोलिसांच्या अत्याचारांमुळे भडकलेल्या विद्यार्थ्यांनी पटांगणातली एक डिस्पेन्सरी जाळून टाकली, आणि पोलीसांवर तुफान दगडफेक केली. ही परिस्थिती आटोक्याबाहेर जात आहे, हे पहाताच उपकुलगुरूंनी त्याच दिवशी, म्हणजे दिनांक ८ डिसेंबर रोजी संपूर्ण विद्यापीठच बेमुदत बंद केल्याचे घोषीत केले, आणि विद्यार्थ्यांना आहे त्या परिस्थितीत तात्काळ हॉस्टेल सोडून जाण्यास सांगितले. विद्यार्थ्यांना लगेच स्टेशनवर जाण्यास मिळावे एवढ्यासाठी उपकुलगुरूंनी स्थानिक बसेसही मागविल्या, आणि ज्या विद्यार्थ्यांकडे परत जाण्यासाठी पैसे नसतील त्यांना त्यांची 'कॉशन मनी' (चांगल्या वर्तणुकीला जामीन म्हणून ठेवलेली रक्कम) परत करण्याची तयारी दर्शवली. तोपर्यंत विद्यापीठाला एक शिक्षणसंस्था हे स्वरूप न रहाता पोलीस छावणीचं स्वरूप प्राप्त झालेलं होतं.

बसमधून स्टेशनवर जात असताना विद्यार्थी संतप्त होते. पोलीसांना अर्वाच्य शिव्या देत होते, आणि 'वापस आ के बदला लेंगे!' अशी धमकीही देत होते. प्रश्न फक्त एवढाच होता की त्यावेळी अध्यक्ष हरिकेश बहाद्दूर कुठे होते? या बहाद्दूराने चांगलीच 'बहाद्दूरी' केली होती. 'पोलिसांच्या अत्याचाराच्या निषेधार्थ मी स्वत:ला अटक करून घेत आहे' अशी घोषणा करून त्यांनी स्वत:ला अटक करून घेतली. परंतु पुढे दोन-तीन दिवसातच त्यांची सुटका झाली. पकडण्यात आलेले इतर विद्यार्थी अजूनही अटकेतच आहेत. या विद्यार्थ्यांना भेटण्याचा मी कसोशीने प्रयत्न करीत होतो. परंतु वाराणसीबाहेरील कुठल्यातरी पोलीस कोठडीत त्यांना ठेवण्यात आल्याचे मला समजले. भडकलेले विद्यार्थी कदाचित आपलाच मुडदा पाडतील या भीतीने अध्यक्षांनी 'सेल्फ प्रोटेक्शन'साठी पोलीस लॉक-

अपचा आसरा घेतलेला होता.

विद्यार्थिनींना मात्र बरीच सवलत होती. त्यांच्यावर कोणतीच सक्ती लादण्यात आली नाही. 'हॉस्टेलमध्ये रहायचं असेल तर रहा, हॉस्टेल सोडून गेलात तरीही, चालेल!' असं विद्यार्थीनींना सांगण्यात आलेलं होतं. परंतु हॉस्टेल सोडून जाण्यास बऱ्याच विद्यार्थीनींनी नकार दिला. 'तुमच्या मुंबईत असं रोजच घडतं का? त्यावेळी मुली काय करतात? आणि मुलं? आम्हाला हे सर्व नवीनच होतं. पण गच्चीतून बघताना केव्हढी मजाऽऽऽ वाटत होती नईऽऽऽ' असे उद्गार जेव्हा एका मुलीने माझ्याकडे काढले, तेव्हा मी हादरलोच!

...विद्यार्थ्यांच्या साध्या मागण्यांचे हे असे परिणाम झाले, आणि दिनांक ८ डिसेंबरपासून बनारस हिंदू विश्वविद्यापीठ पूर्णतः बंद झालेले आहे. जवळजवळ बारा हजार विद्यार्थ्यांचं शिक्षण आज पूर्णपणे थांबलेलं आहे. जनसंघ, सोशॅलिस्ट, मार्क्सवादी, कम्युनिस्ट, स्वतंत्र आणि 'भाक्रांद' यांनी एकत्र येऊन 'विश्वविद्यापीठ बचाव' समिती स्थापन केलेली आहे, आणि शहरात ही समिती जाहीर सभाही घेत आहे. ८ डिसेंबर ते १५ डिसेंबर वाराणसीत तंग वातावरण निर्माण झालेलं होतं. वाराणसीतील माझ्या पहिल्या दिवसाच्या वास्तव्यात मला नाक्यानाक्यावर शिरस्त्राणधारी पोलीसांचे घोळके दिसले होते. त्याचं कारण मला पुढे समजले.

आज वाराणसीही शांत आहे, आणि विद्यापीठही शांत आहे. मात्र केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. हुसेन यांनी पोलिसांच्या मदतीने विद्यापीठ चालू करण्याचा निर्धार व्यक्त केल्याची बातमी येथील 'गांडीव' या हिंदी दैनिकात (२९ डिसेंबर) प्रसिद्ध झालेली आहे. पाहू आता काय होणार आहे ते!

● ● ●


## शनवारवाड्यातील शमादान

**ब. मो. पुरंदरे**

**किंमत : साडेतीन रुपये**

**राजहंस प्रकाशन**

# दंवावरील दंव



किशोर पेंढरकर

मीरा, तू कोण आहेस ? कुठे आहेस ? कशी आहेस ? मला काहीच माहीत नाही. पण तरी मी तुझ्याशी हा असा संवाद करणार आहे. आपली ओळख दृष्ट भेटही नाही. पण तुझ्या त्या एकाच वस्तूनं तुझी ओळख दिलीय. तुझं दर्शन घडवलंय. विलोभनीय पावसानंतरच्या संध्यामेघांसारखं. अनेकविध. गहिरं. रंगीत. धूसर. जीवनाचा एक महापूर असतो, मीरा ! दोन ओंडके जवळ येतात. जवळ रहा-तात. अन् पुन्हा विछडतात. आपण

तसेच आहोत. ओंडके ! एकाच भावनेच्या महापुरातले ओंडके !... तशी तुझी ओळख भेट घेताही येईल. पण मला ती न झाली तरी चालेल. मीरा, भावनेच्या निर्गुण निराकारपणातच केव्हा केव्हा आनंद असतो. एखादा अनामिक सुगंध गाढ हुंगण्यांत गंमत असते. तो कुठून आला हे समजण्यात कदाचित ती तितकी नसते....

आजचीच संध्याकाळची गोष्ट. काळोख चोरपावलानं येत होता. नेहमीच्याच गूढपणानं. पार्कमध्ये हळुहळू सामसूम होऊ लागलेली होती. माझी आवडती. मी पार्कात शिरलो. पावलं ढकलतच. शून्य थकव्यानं अधून मधून डोकावणारा शून्यपणा. पार्कातले निळसर पांढरे दिवे प्रकाश टाकतच होते. माणसाला आजकाल रात्रीसुद्धा दिवसासारख्याच लखलखीत हव्या असतात. हे पार्क्स्चे एकदोन आखीव तुकडे आम्ही शहरवासी निसर्गावर फेकतो. अन्नदात्यासारखे. उपकारानंच. अन् भवती आमच्या संस्कृतीचा कडक पहारा. सिमेंट काँक्रीटच्या किल्ल्यातून ! टंगळून बिगळून मी माझ्या त्या ठराविक Spot जवळ आलो. जागोजाग कपटे, बोळे. भेळेचे, फुटाण्यांचे. आमच्या गोडवे गायलेल्या संस्कृतीचे हे बोळे आता जगाच्या पाठीवरच्या हरेक कोपऱ्यात पोचले असतील. या स्पॉटवर टयूबलाईट्सचा झगझगाट पोचत नाही. एकही नियॉन साईनही इथून दिसत नाही. सुदैवच आणि नवलही. चोहोकडून लताकुंज आत आडोसा आणि शांतता साठवणारे. म्हणूनच हा माझा आवडीचा स्पॉट. तुझाही असणारच. कारण तूही इथे येऊन गेली आहेस म्हणून. मी तिथे टेकलो. थकून. अन् उताणा झालो. डोळे मिटले. निवांत व्हायचा प्रयत्न. ढिलावलो. तणावून. कुणीही आता इथे तडफडू नये. धरणी हिरवळी हातांनी आईच्या मायेनं कुरवाळत होती. हिरवळीत शरीरताप झिरपू लागला. काही क्षण तरी जीवनाचा तो अखंड फिरणारा कन्व्हेयर बेल्ट आता विसरायचा...

अन् त्याच वेळी ती अद्वितीय वस्तू हाताला लागली. तुझी वही. एक्झरसाईज बुक. कॉलेजातल्या नोट्सची. वळलो. कलतेपणीच चिमटीनं फर्रर्र्र करून पानं उलटली. कॅज्युअलीच. बेताचाच प्रकाश होता. वाचता येणार नव्हतंच. पुन्हा उताणा झालो. वही तशीच सोडली. मनावरचे पहाडही पुरतेपणी उतरायचे होते. तणावाचे साप सुटायचे होते. हिरवळीत पुरा झिरपलो नव्हतो. आभाळात पुरा विरलो नव्हतो. पण मग उठायची वेळ झालीच. पार्कबाहेर जीवनाचा तो कन्व्हेयर बेल्ट चालूच होता. त्यात शिरायला हवंच. उठलो. अनिच्छेनंच. पुन्हा वही नजरेला पडली. आता मात्र एका जिज्ञासेने, कसल्याशा ओढीनंच उचलली. घेऊन खोलीवर परतलो...

पहिल्याच पानावर तुझं नाव आहे. पूर्ण नाही. नुसतंच 'मीरा' प्रथमवर्ष विज्ञान. बस इतकंच. कॉलेज नाही. पत्ता नाही. नंतर आहेत कॉलेजातल्या

लेक्चर्सच्या नोट्स. धावल्या. शब्दन् शब्द टिपायची घाई. विषय सर्व. Chemistry, Physics, English, इ. इ. निम्म्या वहीत नोट्स आणि शेवटी शेवटी तुझी डायरी दिसतेय. (डायरी ? आणि कॉलेजच्या वहीत ?) आणि तीही नेहमीची साधी दैनंदिनी नाही. ती आहे तुझ्या भावजीवनाची रोजनिशी. 'भावनिशी' म्हणू या. तुझ्या मनीचा भेटलेला अन् बहरलेला कणन् कण तू तिच्यात पेरला आहेस. जे उगवलंय तेही विलक्षणच आहे. सत्य-शिव आहे. सहज, सुंदर आहे. त्यावरूनच तुझं एक चित्र चित्ती उमटलं. अन् दिव्यत्वाला हे माझे कर आता जुळत आहेत.

या तुझ्या सुरुवातीच्या नोट्स. त्याही मजेशीरच आहेत. केमिस्ट्रीचं लेक्चर. त्या केमिकल अॅक्शन्स. कॉम्पोझिशन्स. फॉम्युले. ओळीमागून ओळी. अन् मधेच समासात नसता आपला एक डोळाच ! मोठा मोठा. सुंदर. मासळीसारखा. ही तुझी चित्रकला. डोळ्यासमोर एक कल्पनाचित्र येतं. तुझ्याच क्लासचं. प्रोफेसर शिकवताहेत ती केमिकल अॅक्शन. स्वतःच्या नाटयमय अॅक्शनसह. तू पूर्ण लक्ष टिपून घेते आहेस. प्रोफेसर फळ्याकडं वळतात. पाठमोरे. अन् अचानक तुझं लक्ष गेलं रेखाकडं. रेखा. तुझी जिव्हाळ्याची मैत्रीण. सुंदर डोळ्यांची. डोळे फुलवून बसलीय. तुला मजा वाटते तिच्या भाबड्या मोठ्या डोळ्यांचीच. तू मिस्कील बनतेस. चट-कन समासात चितारून टाकतेस तिचा डोळाच. ही अशी तू...आता या फिजीक्सच्या नोट्स प्रकाशाच्या परा-वर्तनाचे नियम. नीट घेतलेल्या नोट्स. अन् पुन्हा तुला पंख फुटतात. स्वैर स्वच्छंद. कारण आता तू एक कविताच खरडली आहेस. अगदी न राहवून नोटस्च्या मधेच—

'आभाळीच्या घननीळा
माझी छाया सांभाळा
अता लेऊ द्या मला
दंगुन चंदनकळा...'

अन् पुन्हा नोट्स चालू. हे तुझं आणखी एक रूप. हे कवित्व तुझंच असणार. स्वप्नांच्या आभाळीच्या पाख-राला अशी हळवी हुळवी सावली हवीच. पण मी विचारतो त्या तुझ्या मनाला तरी प्रकाशासारखे काही नियम बियम ? का प्रकाशाहूनही ते तरल आहे ? असू दे. ते तसेच असो. तसेच राहो. तू तुझी सावली आभाळाला देतेच आहेस. तसंच तुझं प्रकाशमनही दे. म्हणजे. तुझी सुगंधित सावली सोन्याची होईल. अन् तशी तुला प्रका-शाची ओढ आहेच की...या वहीची नंतरचीच पानं पहा. तुझी ती जगा-वेगळी भावनिशी आहे. तिच्यांतच तू एका पानावर लिहिलं आहेस — 'मला प्रकाश हवाय. light, more light. मला प्रकाशवेलीवर चढायचंय. ती जाईल तिथपर्यंत. अन् चांदण्यांच्या कळ्या खुडायच्यात्......' अशी आहेस तू. स्वप्नाळू, खुळी, भावुक, ही स्वप्नी-लता मिळायला भाग्य लागतं अन् टिकवायला क्लेष कष्ट लागतात. अशीच

फुलो तुझी स्वप्नवेल. ती कोमेजू नये हीच इच्छा. चांदण्याइतकीच शुभ्र इच्छा. पुढच्याच एका पानी तू कसल्याशा अंधारांत गुदमरून गेली आहेस. हरवली आहेस. काहीतरी शोधत आहेस. हीच तुझी स्वप्नफुलं तुला तुझा सुगंधमार्ग दाखवायला तुझ्याजवळ असोत. नेहमीच !...

त्या अंधारातल्या शोधाप्रमाणेच शोध तसे तू अनेक घेत असावीस. तुला कोडीही पडली आहेत. कधी जगाची, जीवनाची. तर कधी माणसांचीच. तू एका पानावर यक्ष प्रश्न केला आहेस. चिडून चिडून.—'माणसं अशी का वागतात ?खरोखरी का ? अंतराळाचा, सागरतळाचा शोध काढणाऱ्या माणसाला माणसांचाच ठाव कधी लागणार ?' किती नेमकं लिहीलंयस. तुला कुणा माणसांनी नाडलं ? छळलं ? डिनॉसॉरच्या काळीही प्राणीसुद्धा जास्त जवळ अन् चांगले वागले असतील. आम्ही मात्र या कम्युनिकेशनच्या सुवर्णयुगांतही माणूस नावाची बेटंच आहोत नाही, मीरा ?......मृत्यूचाही तुला असाच शोध हवा आहे. तुला समजायला लागल्यानंतर एकदा, तुझ्याच शब्दांत, तुला death consciousness आला. मरण म्हणजे काय ? माणूस कुठून येतो ? कुठे जातो ? हे तुझे असेच यक्षप्रश्न. अन मरणानंतर (कदाचित) अनुभवाला (?) येणारी ती शांतता, ते शून्य जिवंतपणी अनुभवण्याची तुला तीव्र तळमळ आहे. तू लिहलयस—'आज दत्ताबाळांनी विलक्षणच सांगितले. तो तसा साक्षात्कार मला होईल का ? निदान त्याच्या जवळपासतरी कुठेतरी मला पोचता येईल का ? अधूनमधून तरी. खरंच, त्यापुढं इतर सर्व तुच्छ, मिथ्या वाटावं असंच काहीतरी ते असणार'...हे तुझं आणखी एक रूप. एक योगिनी. विरागिणी. चिंतनशीला.

पण हीच विरागिणी कधी कधी रोमँटिक प्रणयिनीही होते. (ते तर तुझं वयच) अन् उन्मादानं लिहून टाकते—'आज मी अतिशय आनंदात आहे. आज खूप नाचावं बागडावसं वाटतंय. ओरडावं, हसावं, खिदळावं, खंडाळ्याच्या घाटातल्या झऱ्यांबरोबर खूप खोल दरीत खुशाल हुंदडत गडगडत जावं. गडबडा लोळावं, जग किती सुंदर आहे. आज मला काय झालंय मलाच सांगता येणार नाही'......तुला काय झालं असावं ते मलाही सांगता येणार नाही. कारण तू वेडीनं असंच नेहमी गूढ लिहीलं आहेस. घडलं काय तेच नेमकं न लिहिता. म्हणूनच ही म्हणायची तुझी भावनिशी. अन् तुला म्हणायचं भावुक. वेडी, चंचल, श्रावणमासासारखी, उनपावसासारखी. कारण बागडणाऱ्या तुला केव्हा केव्हा श्रावण सरीही दाटून आल्या आहेत. अन तू एका पानावर लिहिलंयस—'आज मी खूप दु:खी आहे. रडू येतय. पण उपयोगच काय ? माझ्या आसवांनी कोणी ओलं होणार आहे का ? मग डोळ्यांना तरी बिचाऱ्यांना का कष्ट द्यायचे ? उगीचच कुणासाठी तरी ? पण तरीही रडू येतच आहे. अन् मी रडतेय...'

कुणासाठी तू तुझे अमोल मोती बरसत होतीस ? कुणी तुझ्या मनोमेघांवर वीज पांखडली ? तू रडताना मी तिथे असतो तर मोठ्या भावाप्रमाणं हळुवार हातांनी तुझ्या मनाच्या पाकळ्या उलगडून पाह्यल्या असत्या. तुला कधी रडवणारी, कधी हंसवणारी ही व्यक्ती कोण आहे ? तुझा प्रियकर ? की तुझी जिवाची सखी ? कोणी रेखा-सुमा-किंवा-लता ? तिलाच तू एका पानावर तिच्या वाढ-दिवसाच्या शुभ कामना दिल्या आहेस. तू चितारली आहेस नाजूक साजुक फुलं अन् खाली लिहील्या आहेस ओळी – 'प्रिय रेखा, तुला देण्यासाठी माझ्या-पाशी इतकीच फुलं आहेत. अन तीही तूच दिलेल्या त्या कळ्यांची...Happy Birthday. तुझी मीरा...' काय गं ? ही फुलं, शुभेच्छा सगळं तुझ्या वहीतच आहे. मग ते तुझ्या प्रियसखीला कसं काय बुवा पोचलं ? पण असो. तो तुम्हा जिवाभावाच्या मैत्रिणीमधला एक प्रेमळ खुळेपणा. आम्हाला ते काय समजणार ? ते फक्त तुझ्या त्या रेखा-सुमा-लतांनाच समजणार. त्याच तुला नीट समजून घेत असतील. तू त्यांनाच एका पानावर लिहीलं आहेस – 'खरंच तुम्ही मला समजून घेता का ग ? घेत असालच. म्हणूनच तुम्ही माझ्यावर प्रेम करता इतकं !...' अशी आहेस तू. मायाळू मनस्वी, रसिक-तात्विक, हळवी-विचारी, उलट-सुलट, द्विदल, खेळकर, उमदी, उदात्त, सखोल.

तुझी ही भावनिशी आज संध्याकाळी मला हिरवळीवर भेटली. हिरवळीवरील दंवासारखीच. अन् तिच्या पानावरील हे तुझे भावदंव. भावदंवाचे मोती. दंवा-वरील दंव. नाजुक. रमणीय. पण किती भेदक ! एक्स-रे सारखे. किती पार-दर्शक ! नितळ पाण्यासारखे. तळठाव घेणारे. माझ्या मनाचा डोहं पार ढवळून निघालाय. पार तळापासून. तसा मनातल्या मनात खोल बुड्या घेण्याचा मलाही छंद आहेच. पण आज हाती लागलेलं काही वेगळंच आहे....तुफानी झंझावात. झाडामाडांचे उंच शेंडे. अफाट डोलणारे. घुसळले जाणारे. त्यावरच कुठेतरी मी. कानात, शरीरात सळसळ. अपरंपार सळसळ. भयाण वारा. असह्य घोंघावा...असं काहीतरी आज वाटलंय. तर कधी शांत खोलच दरी. दोहो बाजूंना उंचच कड़े. आभाळ झाकणारे. गर्द झाडी. दरीच्या तळात आपण. भवती शांतता. काळ थांबलेला. सर्वच निश्चल. नीरव शून्य. काहीच नसलेपणा. असंही वाटलं....

तुझी भावनिशी मी वाचतो आहे. आत्ता या अपरात्री जागूनही. पण समा-धान होत नाहीय्याय. पुनः पुन्हा वाचूनही ! अतृप्ती. हिरव्यागार आम-राईतला मोहोरगंध हुंगतानाची अतृप्ती. सुशांत अतृप्ती. भावनिशीची ही आर-स्पानी पानं मी वाचतोय. अन् माझ्याही मनाची पानं सैर भैर उडाली आहेत. कधी मनाची पानं अशीच उडावी, भिरकटावीसं वाटतं. त्यांचा पाऊस व्हावा. अन् कुणा जिवाभावाच्या व्यक्ती-संगत आपण भान विसरून त्यात चिंब चिंब भिजावसं वाटतं. दोघांनी ती

सगळी वेचावी. पुन्हा उधळावी. पुन्हा त्यांचा पाऊस व्हावा. पुन्हा त्यात भिजावं. पुन्हा ती उधळावी. पुन्हा त्यात भिजावं....मनातल्या पानांवर सवड सापडेल तसं मीही काहीतरी लिहून ठेवतो. अन् मग त्यावर चढते धाई-गर्दीच्या दिवसांची रूक्ष माती. आजच्या या वादळानं ती उडालीय. ती पानही उधळलीत. अन् त्याच बरसातीच्या ओळी या अशा कोसळताहेत.

आजचा माणूस. मेलेलं मढंच. नुसतं धावणारं पिसाट पिशाच. धावणारं. पैशाच्या मागं. वेळेच्या मागं. कदाचित् सुखाच्या उद्देशानं. पण शेवटी उद्देशच विसरून. सगळंच विसरून. मनुष्यपणा. भावना. रमणीयता. सुंदरता. सगळंच. आणि धावताना वाटेवर सांडतंय समाधान, स्वास्थ्य, शांती. घोडयाच्या तोंडातल्या फेसाप्रमाणं.... का हे धावणं ? ऊर पिटून ! ऊर पिंजून ! आपल्यातच विरघळून जायला सवड नाही. बाहेर अवकाशात पसरून, विसरून जाण्याची आवड नाही. कशाला ही उदरांची शर्यत ? शरीराचा सर्व पीळ उसवेपर्यंत ! कशाला हा कंटाळवाणा जत्राबाजार ? ह्या धावणाऱ्या पिशाच्चाला कधी असे अनुभव स्पर्शून तरी जात असतील ? विरघळण्याचे ? दरवळून जाण्याचे ? घुसळण्याचे ? नीरवतेचे ?

आम्ही खरंच आनंदी आहोत ? सुखी आहोत ? खरोखरच ? शास्त्रीय प्रगतीच्या बहारामधेही समाधान फुलतंय का ? खरंच ? आम्हाला काही नवं गवसलंय ? का होतं तेच गळालंय ? Atomic explosion, population explosion, polution explosion अशा एक्स्प्लोजन्सच्या आजच्या युगात आमच्या स्वानंदाचं काय झालंय ? explosion च ? का Compression ? जाऊ दे. एकटयाच्या हातातल्या या गोष्टी नव्हत. असं म्हणतात की प्रलय व्हायचाय. काही हजार लाख वर्षांनी: कदाचित् जलप्रलय. अग्निप्रलय. ॲटॉमिक प्रलय. किंवा आणखी कसला प्रलय. पण आताही एक प्रलयकाळच चालू नाही का ? निसर्गच नष्ट होण्याचा. प्रलय. कृत्रीमतेचा प्रलय. अतिऐहिकतेचा प्रलय. उथळ-पोकळपणाचा प्रलय. ध्वनी-कल्लोळाचा प्रलय. मूल्यहीनतेचा प्रलय. अमाणुसकीचा प्रलय.

आता एव्हाना रात्रीचा एक वाजलाय. मी बाल्कनीत आलोय. चंद्र दिसत नाहीच आहे. आकाशाचा क्षुद्र तुकडा तेवढा दिसतोय. इमारतीमधून. जेमतेमच. जत्रेच्या अफाट गर्दीत सापडलेल्या पढरीच्या विठ्ठलासारखा. अन् तोही धुरकट, मळकट. आजुबाजूच्या इमारतींच्या आवारात दिवे ढणढणताहेत. हेच आपल चांदणं, हीच पौर्णिमा. हीच शांत अमावस्या. पलीकडचा तो हमरस्ता वाहनांचे फरफर फरकाटे रात्रीला कापताहेत. त्या तिकडे त्या क्लबमध्ये कुणाचासा लग्नसोहळा चाललाय. ती रोषणाई. ऐश्वर्याची आग पेटलीय. ती ऑर्केस्ट्रा जोडीला. ढॅण् ढॅण् ढॅण् संगीत ठोकतोय....

सुदैवानं झोप हा निसर्ग-नियम पृथ्वीवरील मानवाला अजून तरी पारखा

झालेला नाहीय्याय्. मलाही झापड येते आहे. उद्या ही तुझी वही मी नाईलाजानंच परत त्या कुंजांत ठेवणार आहे. ती तुझी तुला मिळायला हवी म्हणूनच केवळ. अर्थात् जर तू अजून या जगात असशील तर. कारण भावनिशीच्या शेवटच्या पानावर तू वैतागून लिहिलं आहेस – ' मी आज संपले आहे. मी जगात आलेच कशाला? जीवच का जात नाही? आत्महत्त्या करावी का?'...आता हा तुझा नेहमीचाच एक मनस्वीपणा आहे का खरोखरच तुझा आत्महत्त्येचा निश्चय झालेला आहे? समजायला मार्गच नाही. पण मीरा मी सांगतो तू या जगातून जाऊ नकोस! खरंच नकोस! तुझ्यासारख्या भाबड्या फुलामुळे, दंवबिंदूमुळेच तर हे मानभावी, ढोंगी, यांत्रिक जग सुंदर होऊन जातं ग!...आणि जर तू गेलीच असशील तर?...तर?...तर एकच मागणी. मानशील? उद्या तू त्या कुंजातल्या वेलीवर एक फूल होऊन ये. अन् अलगदपणे, खाली हिरवळीवर मी ठेवलेल्या तुझ्या या वहीवर येऊन उतर. फूलरूपात. मी काय ते समजेन. अन् ती तुझी अनुज्ञा समजून ते फूल अन् ती वही पुन्हा घेऊन मी परतेन. एक पूज्य ठेवा, माझ्यासाठी एक सोबत म्हणून...

● ● ●


**फिडेल चे आणि क्रांती**

अरूण साधू

मूल्य : सात रुपये

**एका पराभवाची कहाणी**

ले. : ब्रिगेडियर जे. पी. दळवी

अनुवाद : अनंत भावे

मूल्य : पंधरा रुपये

राजहंस प्रकाशन



## जबानी चौथी । शेवटचा हप्ता पाचवा

लेखक : नारायण सान्याल

अनुवादक : अशोक शहाणे

मणिपूर न् इंफाळ दोन्ही काही त्या वर्षी पडली नाहीत. आमचा पहिलाच प्रयत्न असा व्यर्थ ठरला. पाऊस फार लौकर कोसळायला लागला. अन् ब्रह्मदेशच्या जंगलातला पाऊस म्हंजे काय चीज आहे, ते प्रत्यक्ष बघितल्याशिवाय कळण्याजोगं नाही. शस्त्रास्त्रं न् रसद—— आम्हाला काहीच मिळेनासं झालं. इकडे शत्रूची सरबराह नीटच चालू राह्यली. कारण त्यांच्याकडे विमानबळ पुरेसं होतं. सगळं सामानसुमान विमानानं येत राह्यलं त्यांचं. अन् शिवाय नवीन सैन्यपण.

चव्वेचाळीस सालच्या सप्टेंबर महिन्यांत अखेरीअखेरीला आमच्या पहिल्या डिव्हिजनच हेडक्वार्टर्स मंडालेला उघडलं. आमच्या दोन नंबर ब्रिगेडचं ——म्हंजे गांधी ब्रिगेडचं——हेडक्वार्टर्सपण मंडालेतच होतं. सुभाष ब्रिगेडनं बुदालीनला छावणी टाकली. अन् आझाद ब्रिगेडची छावणी होती छाऊनगाऊला.

चालू लेखमाला

# मी नेताजींना बघितलंय

पावसाला निरोप द्यायच्या वेळेलाच सुभद्रा जयस्वाललापण आम्ही निरोप दिला. आम्ही म्हंजे गांधी ब्रिगेडच्या आमच्या कंपनीनं. चक्क हारबीर घालून जवानांनी आपल्या भावीजींना निरोप दिला. सुभद्रा निघून गेली तिच्या युनिटमधे. मेमिओला. आमचं बेस हॉस्पिटल तेव्हा दोन ठिकाणी होतं. मेमिओ न् मनिवा. जायच्या दिवशी मला बाजूला घेऊन माझे दोन्ही हात आपल्या हातात घेऊन ती म्हणाली-- पण ह्या सगळ्या खाजगी गोष्टी कशाला! नाही का?

अशा रीतीनं आझाद हिंद सेनेच्या न् जपानी सैन्याच्या आक्रमणाच्या पहिल्या अंकाचा पडदा पडला. पण म्हणून काही सगळंच संपलं असं नाही. ह्या पहिल्या अंकाच्या पहिल्या दृश्याची सुरुवात झाली होती. चव्वेचाळीस सालच्या मार्च महिन्यात. पावसाळचाच्या शेवटी आम्ही माघार घेतल्यावर हा अंक संपला. अगदी हलक्या प्रतीची युद्धसामग्री घेऊन अर्धपोटी, उपाशीपोटी आम्ही लढलो होतो ब्रिटिश सैन्या-बरोबर. ब्रह्मदेशच्या विस्तीर्ण रणां-गणात. अन् भारतातपण. इतिहास साक्षी आहे--ब्रह्मदेशची सरहद्द ओलांडून भारतात दीडशे मैल आत आलो होतो आम्ही! एक लाख पन्नास हजार चौरस मैलाचा भारतातला टापू आम्ही ताब्यात घेतला होता! आझाद हिंद सेनेनं! ह्या थोडक्या काळात आझाद हिंद बँकेत वीस करोड रुपये जमा झाले होते! दान खाती! नेताजींच्या ह्या युद्धप्रयत्नाला मलायातल्या न् ब्रह्म-देशातल्या भारतीयांनी मोठ्या श्रद्धेनं केलेली मदत होती ती! अन् जवळ-जवळ चार हजार सैनिकांनी मातृ-भूमीच्या स्वातंत्र्याखातर आपले प्राण वेचले होते ह्या लढाईत.

आता तुम्ही कदाचित् म्हणाल— इतकं करूनही इंफाळवर काही कब्जा मिळवता आला नाहीच ना तुम्हाला!

मी कबूल करतो. इंफाळ काही मिळवता आलं नाही आम्हाला. पण कारण माहीत आहे का तुम्हाला? कारण आम्हाला इंफाळ घ्यायचंच नव्हतं मुळी!

मला माहीत आहे, आता तुम्ही हसत असाल! किंवा तुम्हाला इसापची ती गोष्ट आठवली असेल. कोल्हा न् द्राक्षं! पण हे बघा, मी सांगतोय् ते अगदी

खरं आहे! अक्षर न् अक्षर खरं आहे! मनात आलं असतं तर इंफाळ घेता आलं असतं आम्हाला! पण मुद्दामच इंफाळ घेतलं नाही आम्ही!

मी सरळ खुलासाच करतो कसा! म्हंजे तुमचा विश्वास बसेल.

एक वेळ अशी होती की कोणत्याही क्षणी आम्हाला इंफाळ घेता आलं असतं. इंफाळ शहरापास्नं निव्वळ दोन मैलांवर आम्ही वाटच बघत बसलो होतो. ब्रिटिश सेनापतीनं कितीदांतरी इंफाळहून आपलं सैन्य दिमापूरला हलवायचा प्रयत्न केला. पण कोहिमा-इंफाळ रस्त्यावर बसलेल्या आमच्या सैन्यानं त्यांची ती वाट बंद करून टाकली होती. ब्रिटिशांना आधार घेता येईना. आझाद हिंद सेना न् जपानी सैन्यानं वाट रोखल्यामुळं त्यांना माघारी फिरता येईना. वाट मोकळी मिळाली असती, तर ते नक्कीच पळून गेले असते. पण आमच्या मनात वेगळंच होतं. इंफाळमधे जितकं म्हणून ब्रिटिश सैन्य होतं, ते सगळं आम्हाला कैदी म्हणून ताब्यात घ्यायचं होतं!

इंफाळ शहर जरी सखल जमिनीवर वसलं असलं, तरी चारीबाजूंनी ते डोंगरांनी वेढलेलं आहे. ह्या डोंगरांच्या मधेमधे किरकोळ वाटा आहेत. शहरात जायला-यायला वाटा म्हणताना फक्त एवढ्याच! तोफा रोखून आम्ही ह्या पळवाटा बंद करून टाकल्या! तेव्हा त्यांच्यासमोर फक्त दोनच मार्ग शिल्लक राह्यले. एक म्हंजे शरण येणं! किंवा मग मरेपर्यंत लढणं!

आम्ही त्यांना पळून जाऊ दिलं असतं तर जवळपास रक्त न सांडताच आम्हाला इंफाळ ताब्यात घेता आलं असतं! पण इंफाळच्या कब्जापेक्षाही त्यावेळी आम्हाला जरूर होती ह्या शहरातल्या ब्रिटिश सैनिकांजवळ अस-लेल्या शस्त्रास्त्रांची!

त्यावेळी आमच्याजवळ शस्त्रं होती, त्यांच्या बळावर भारतावर हल्ला करून चालायचं नाही—असं नेताजींचं मत होतं. दुर्गम डोंगराळ भागात आमच्या हातचा मार खात खात ते हळूहळू मागं हटले होते. पण ब्रह्मदेश अन् आसामचा डोंगराळ टापू पार करून ज्या क्षणी आम्ही बंगालच्या सखल इलाख्यात पाऊल टाकलं असतं, त्याच क्षणी ब्रिटिश सैन्य माघारी वळून उभं राह्यलं असतं! तिथं मग टँक अन् सज्ज गाड्यांच्या एका कंपनीला आमच्या पायदळ पलटणीच्या चक्क एका डिव्हिजनचा देखील परामर्श घेता आला असता. त्यामुळे आधुनिक युद्धसामग्रीची आम्हाला फारफार जरूर होती.

शिवाय जपान्यांनी विश्वासघात केला तर मग निव्वळ ब्रिटिशांना हाक-लून लावूनच आमची लढाई संपणार नव्हती! म्हणूनच नेताजींच्या असं मनात होतं—की ब्रह्मदेशच्या रणां-गणात ब्रिटिशांनी जे पाच लाख सैन्य उतरवलेलं आहे, त्यापैकी दीड लाख भारतीय सैनिक आपण ताब्यात घ्यायला हवेत! आम्ही कोणत्या मुक्तिमंत्राची दीक्षा घेऊन कशी लढाई करतोय, हे त्या भारतीय सैनिकांना माहीत नव्हतं.

नेताजींना फक्त एकदाच का ह्या भारतीय सैनिकांसमोर उभं राहता आलं, अन् समोर माइक घेऊन एकच तास जर त्यांच्यासमोर आपलं मन मोकळं करायची संधी मिळाली, तर हे सगळे सैनिक स्वेच्छेने आझाद हिंद सेनेत भरती होतील--असा नेताजींचा विश्वास होता!

इंफाळचा ताबा घेण्यापेक्षा तिथल्या भारतीय सैनिकांना आपल्यात सामील करून घेणं आमच्या दृष्टीनं जास्ती महत्त्वाचं होतं.

मागं फिरायची वाट जेव्हा अशी बंद होऊन गेली, तेव्हा नाइलाजानं ब्रिटिशांना 'बॉक्स डिफेन्स'ची व्यवस्था करावी लागली. म्हंजे एकप्रकारचा व्यूह. ह्यात सज्ज गाड्या अन् रणगाडे छावणीच्या चोहीकडे उभे करून ठेव-तात. हा म्हंजे छावणीभोवतालचा लोखंडी पडदाच. ह्या पड्याच्या आत सगळं पायदळ आसरा घेतं. ब्रिटिशांना हा व्यूहच रचावा लागला.

आता युद्धाच्या सुरुवातीला जपानी विमानदळ ब्रिटिश विमानदळापेक्षा खूपच प्रबळ होतं. पण नंतर दुसऱ्या टप्प्यात जपाननं सगळी विमानं हलवली प्रशांत महासागरातल्या वेगवेगळ्या बेटात अमेरिकेला तोंड देण्याकरता म्हणून. जळी-स्थळी-अंतराळी अमेरिकन हल्ला थोपवायचा तर तसं करणं भागच होतं. नाहीतर स्वतःचं घर संभाळणंच जपानला जमलं नसतं!

जपानी विमान आम्हाला थोडीशी का होईना मिळाली असती, तर मग ब्रिटिशांचा हा बॉक्स डिफेन्स मोडून काढणं आम्हाला मुळीच जड गेलं नसतं. शिवाय जपानी विमानं इकडे येत नाहीत असं बघून ब्रिटिशांनी ब्रह्मी रणांगणात पुरतं एक डिव्हिजन नवं सैन्य आणून सोडलं. ते तीन महिने त्यांची रसद अन् शस्त्रास्त्रं विमानानं येत राह्यली. अन् आम्हाला मात्र रंगून-हून काहीच नवी मदत मिळाली नाही.

ह्याखेरीज आणखीही एक कारण होतं हे आता कबूल करायलाच पाह्यजे. जपानी सेनापती स्वतःवर भलतेच खूष होते. मलायातनं अन् ब्रह्मदेशातनं जसा ब्रिटिश सैन्यानं पळ काढला, तसंच ते इथंही करतील अशी जपानी सेनापती आशा बाळगून होते पण अंतराळीच्या लढाईत ब्रिटिशांना काही विरोधच होण्याजोगा नव्हता, त्यामुळं त्यांनी पळ काढला नाही!

शिवाय आम्हालापण हल्ला चढवा-यला तसा उशीरच झाला होता.

थोडक्यात काय तर चव्वेचाळीस सालच्या सुरुवातीच्या त्या काळात आम्हाला काही इंफाळ घेता आलं नाही.

तसं आणखीही एक कारण होतं जपानी लोकांकडनं आम्हास प्रत्यक्षात हवं ते सहकार्य अन् मदत मिळालीच नाही. जपानचं मोठ्ठं लष्करी दप्तर पुरतं सहकार्य करायला तयार होतं पण प्रत्यक्ष रणांगणावर असलेल्या सेना-पतींना आमचा तितकासा भरोसा वाटत नव्हता. भारतात आपलं साम्राज्य स्थापन करायची इच्छा त्यांच्या मनात

लपलेली होती. अन् आम्ही काही त्यांची ही ताबेदारी करायला अजिबातच तयार नाही असं आमच्या ध्यानात आल्या आल्या त्यांनी सहकार्य नाकारलं.

चव्वेचाळीसच्या सप्टेंबरच्या अखेरीला नेताजी ' यू 'मध्ये होते. म्हंजे मंजले न् कालेवाच्या मधोमध होतं. परतलेल्या वेगवेगळ्या कंपनीतल्या लोकांची न् नेताजींची इथंच गाठ पडली. परतीच्या वाटेवर आमची न् नेताजींची गाठ बऱ्याच दिवसांनी इथंच पडली.

सगळ्या सैनिकांच्याकडनं ते माहिती गोळा करत होते. ह्या मोहिमेच्या अनुभवावरच पुढची मोहिम आखायला हवी. पंधराएक दिवस छावणीछावणीतनं फिरत ते प्रत्यक्ष अनुभव ऐकत होते.

मग मंडालेला एक नंबर डिव्हिजनचे डिव्हिजनल कमांडर न् ब्रिगेड कमांडर्सची एक बैठक बसली नेताजींच्या बरोबर. ह्या बैठकीत म्हणे एक गोष्ट उघड झाली की जपानी लायाझाँ विभागावर — म्हंजे याकुरो किकानवर — कुणाचाच विश्वास राह्यलेला नाही. तेव्हा ह्या डिपार्टमेंटशी सगळे संबंध तोडून टाकायचं ठरलं. अन् सरळ टोकिओच्या जपान सरकारशी न् ब्रह्मदेशातल्या त्यांच्या हेडक्वार्टर्सशीच संधान ठेवायचं असं ठरलं. जरूर पडली तर नेताजींनी एकदा टोकिओला जावं न् खुद्द तोजोशीं ह्याबद्दल बोलणी करावीत असं पण ह्या बैठकीत ठरलं.

पुढल्या महिन्यात — म्हंजे ऑक्टोबरमधे नेताजी मंडालेहून मेमिओला गेले. तिथल्या इस्पितळाची पहाणी करायला. तिथं तेव्हा जवळजवळ दोन हजार पेशंट्स होते. त्यांच्यातल्या बऱ्याचजणांची हालत कठीण होती. मलेरिया न् आमांशाचे रोगीच जास्त होते. गोळीनं जखमी झालेले पण बरेच होते.

राणी वाहिनीतल्या बऱ्याच मुली तेव्हा ह्या इस्पितळातच होत्या. त्या नर्सिंग करायच्या. सुभद्रा जयस्वालपण तेव्हा मेमिओलाच होती. रोग्यांच्या मानानं नर्सेस फारच कमी होत्या. त्यामुळं पावसाळ्याच्या दिवसात आम्ही — म्हंजे सैनिक — जेव्हा विश्रांति घेत होतो, तेव्हा राणीवाहिनीतल्या ह्या मुली दिवसरात्र श्रमून इस्पितळातलं काम करत होत्या.

ह्या इस्पितळाच्या पहाणीच्या वेळी नेताजींना कळलं, की बेला दत्त नावाची सोळा वर्षांची बंगाली मुलगी एकटीच पंच्याऐंशी आमांशाच्या रोग्यांची सेवाशुश्रूषा करते! नर्सेसच्या टंचाईमुळे ही मुलगी एकटीच त्या पंचाऐंशी रोग्यांचे कपडे धुणं, अंग पुसणं, अंथरूण करणं, त्यांना औषध देणं, जेवण देणं वगैरे सगळी कामं एकहातीच करायची!

नेताजी पहाणीला आले तेव्हा एकजात सगळ्यांनीच ह्या नर्सेसचं फार कौतुक केलं. आजारी पडून घरी राह्यलो असतो, तरी आयाबहिणींच्या हातनंपण ह्याच्यापेक्षा जास्ती सेवा झाली नसती— असं सगळे म्हणाले.

नेताजींनी ह्या षोडशीला बोलवून घेतलं. तिला आशीर्वाद देताना त्यांचा गळा दाटून आला होता!

नेताजींची पहाणी होऊन गेल्यावर दुसऱ्याच दिवशी बेला दत्तच्या नावानं एक हुकूम निघाला. बेला दत्त नर्सची हवालदार झाली होती !

नर्सिंग विभागातल्या मुलींच्या कमांडर होत्या लेफ्टनंट मिसेस चतर्जी म्हणून. त्या न् त्यांचे मिस्टर--दोघंही मलायात राहणारे. दोघांनीही बरोबरच आझाद हिंद सेनेत नाव दाखल केलं होतं. श्री. चतर्जी लढाईत कामी आले होते. पण मिसेस चतर्जी काही दु:खानं हातपाय गाळून बसल्या नाहीत. अखंड निष्ठेनं त्या सैनिकाचं कर्तव्य बजावत गेल्या: त्यांचं कर्तव्य म्हंजे सैनिकांची शुश्रूषा. नेताजी इस्पितळाची पाहणी करायला आले, तेव्हा त्यांनी मिसेस चतर्जींच्या कामाची खूप प्रशंसा केली न् मिसेस चतर्जी लेफ्टनंट झाल्या. खरं तर ह्या नर्सिंग विभागात मिसेस चतर्जी एवढ्या एकच लेफ्टनट होत्या. त्यांच्यापास्नं प्रेरणा घेऊन बाकीच्या मुलींनी पण आपल्या कर्तव्यात कसलीच कसूर ठेवली नव्हती. ह्यांच्या ब्रिगेडचं नाव ठेवलं होतं झाशीच्या राणीच्या नावावरनं. त्या नावाला एवढासासुद्धा कलंक ह्या सगळयांनी लागू दिला नाही कधीच ! ह्या सगळ्या बिनओळखीच्या, बिननावाच्या मुलींच्या शौर्याच्या, सेवेच्या न् कष्ट सहन करण्याच्या गोष्टी ह्या इस्पितळातल्या रोग्यांच्या मन:पटावरच फक्त लिहिल्या गेल्या ! भारताच्या स्वातंत्र्याचा इतिहास लिहिणारा पण कदाचित् विसरून जाईल त्यांचा उल्लेख करायला ! पण पोस्टाची तिकिटं जमवायचा छंद असलेल्या मंडळींच्याजवळ आझाद हिंद सरकारच्या तीन आणे किंमतीच्या तिकिटावर ह्या निनावी मुलींच्याबद्दलची कृतज्ञता कायमच उजळ होऊन राहील !

लढाईवरनं परतलेल्या सैनिकांच्या तुकड्यांची पाहणी करून न् इस्पितळातलं काम स्वत:च्या डोळ्यांनी बघून नेताजी मंडालेहून रंगूनला जायला निघाले. तारीख होती अकरा ऑक्टोबर. मंडालेहून निघायच्या दोनच दिवस आधी त्यांना जपानी सरकारचं आमंत्रण मिळालं. टोकिओला यायचं. पुढच्या कामाची आखणी करण्याकरता. जपान सरकारकडनं अशी निमंत्रणं नेहमीच यायची नेताजींना. राजकारणी म्हणून जपान सरकार फार मान द्यायचं नेताजींना. अन् बैठकीत फक्त भारताबद्दल किंवा आझाद हिंद सेनेबद्दलच बोलणी व्हायची असं नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणातले ते तज्ज्ञ मानले जायचे. अन् जपानची परराष्ट्र नीति ठरवण्याकरता जपान सरकार त्यांचा सल्ला मागायचं.

प्रमुख मंडळीसकट नेताजी रंगूनला गेले. लष्करी चिटणीस न् सेनापतींना घेऊन त्यांनी एक बैठक बसवली. आझाद हिंद सरकारच्या मंत्र्यांना न् सभासदांना रणांगणावरनं नुकत्याच परतलेल्या सेनापतींना कायकाय अनुभव आले ते ऐकायचं होतं.

आपल्या संक्षिप्त भाषणात नेताजींनी तत्कालीन युद्धस्थिति सांगून टाकली होती. ह्या भाषणाचं टिपण शाहनवाजखॉंनी आपल्या आठवणीत दिलंय्.


कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग
SATHE
MALTex
BISCUITS
भरपूर
माल्ट असलेली
भारतातील एकमेव बिस्किटे
साठे
माल्टएक्स
कोणतीही वेळ
कोणताही प्रसंग।
साठे माल्टएक्स बिस्किटें
आणतात रंग॥
साठे माल्टएक्स बिस्किटांची
आगळीच रुची।
साठे माल्टएक्स बिस्किटें
कुरकुरीत, व ताजी॥

नेताजी म्हणाले—

हल्ला चढवायला आपल्याला खूपच उशीर झाला होता ही गोष्ट कबूल करण्यावाचून गत्यंतरच नाही. शत्रूच्या सैन्यापेक्षा निसर्गाच्या हातीच आपण जास्ती मार खाल्ला. रस्तेबिस्ते सगळे पाण्याखाली बुडून गेले होते. ब्रह्मदेशातल्या सगळ्या नद्या उत्तरेकडनं दक्षिणेकडं वाहणाऱ्या. त्याच्यामुळं आपल्याला प्रवाहाच्या विरुद्धच जावं लागलं. इकडे शत्रूचं सैन्य ज्या भागात होतं—म्हंजे इंफाळ-कोहिमाच्या आसपास न् मार्ग— तिकडे रस्ते वगैरे जास्ती नीट. उमेद एवढीच होती की पावसाळ्याच्या आधी आपल्याला इंफाळ घेऊन टाकता येईल. तसं इंफाळ घ्यतापण आलं असतं—आपल्याला विमानदलाची मदत झाली असती तर! अन् शिवाय इंफाळ-कोहिमा रस्ता अडवून आपण त्यांची माघार घ्यायची वाट बंद केली नसती तर!

पावसाळ्याच्या आधी हरएक ठिकाणी अन् दरएक चकमकीत आपण एकतर आगेकूचच केलेली होती किंवा शत्रूचा पराभव करून टाकला होता. आराकानच्या रणांगणात आपल्या शत्रूची आगेकूच पुरती रोधता आली होती. कालादानच्या टापूत आपण शत्रूची फळी फोडून पुढं गेलो होतो. टिड्डीम, पालेल न् कोहिमातपण आपली आगेकूच अव्याहतच होती. अन् तरी ह्या प्रत्येकच टापूत शत्रूचं सैन्य आपल्यापेक्षा जास्तीच होतं. शिवाय त्यांची रसदपुरवठ्याची व्यवस्था न् युद्धसामुग्री आपल्यापेक्षा कितीतरी चांगल्या दर्जाची होती.

तेव्हा ह्या भागात आपल्या सैन्यानं कर्तबगारीची छाप पाडली की त्याबद्दल आपल्याला रास्त अभिमानच वाटावा.

पाऊस सुरू झाल्यावर इंफाळच्या भागातलं आपलं आक्रमण आपण स्थगित ठेवलं. ह्या संधीचा फायदा घेऊन शत्रूनं सज्ज सैन्य पाठवून कोहिमा-इंफाळची सडक परत आपल्या ताब्यात घेतली. आता प्रश्न असा आला की लढण्याकरता आपल्या सैन्यानं छावणी कुठं टाकावी? माझ्यापुढं दोन मार्ग दिसत होते—एकतर बिशनपूर-पालेल इथं मुख्य छावणी टाकून शत्रूची आगेकूच रोखून धरावी, किंवा मग मागं यावं न् आपल्याला त्या मानानं अनुकूल अशा जागी सैन्य जमवावं.

ह्या मोहिमेतनं आपल्याला काय धडा मिळाला?—असं कदाचित् तुम्ही आता विचारालं. त्याला माझं उत्तर असं आहे—ह्या मोहिमेनं आपलं दीक्षा घेण्याचं पर्व पार पडलं हीं सर्वांत मोठी गोष्ट आहे. साधनेची वाट आत आपल्यासमोर मोकळी झाली. आपण अग्निमंत्राची दीक्षा घेतली, हा ह्या मोहिमेचा सगळ्यांत मोठा फायदा. रायफलींची रसद संपून गेल्यावर सैन्याच्या एका तुकडीला माघार घ्यायला सांगितलं गेलं. ही कंपनी काही जन्मजात सैनिकांची नव्हती. आझाद हिंद सेनेतच त्यांनी सैनिकी जीवनाला सुरवात केलेली. पूर्वी ही मंडळी व्यापार करत होती, नोकरी करत होती. पण ह्या

मंडळींनीच माघार घ्यायचं नाकारलं. त्यांनी रायफलींना संगिनी चढवल्या. अन् टोळक्या-टोळक्यांनी ते शत्रूवर तुटून पडले. अन् ती लढाई जिंकूनच ते परतले !

आपल्या सैनिकांचा आत्मविश्वास खूप वाढलाय् ह्यांत शंकाच नाही. मला ठाऊक आहे, की शत्रुसैन्यांतल्या भारतीय सैनिकांना आझाद हिंद सेनेत भरती व्हायची इच्छा आहे. त्यांना आपल्यात सामील करून घ्यायची व्यवस्थाही आपण करायला हवी. आपल्याकडे युद्धसामग्रीची फार ... टंचाई... आहे. ते आले तर बरोबर शस्त्रं घेऊनच येतील. हा आपला प्रचंड फायदा आहे.

शत्रूच्या सगळ्या युक्त्यापण ह्या काही महिन्यांच्या काळात आपल्याला ठऊक झाल्यायत. त्यांचे बरेचचे कागदपत्रपण आपल्या हाती आलेले आहेत. अन् ह्या मोहिमेमुळे आपल्याकडल्या सेनापतींना न् साध्या शिपायांनापण जो अनुभव मिळालेला आहे, तोही फार मोलाचा आहे. ही मोहीम सुरू व्हायच्या आधी जपानी जनरलसचा आपल्या सैनिकांच्यावर अजिबातच विश्वास नव्हता. आपल्या सैन्याची लहानलहान टोळकी करून ती आपल्याबरोबर हेरगिरी करायला वापरायची अशी त्यांची कल्पना होती. मी काही त्याला तयार झालो नाही. एक सबंध रणांगण निव्वळ आमच्याकरता सोडून द्यायची मागणी मी केली होती. ती मागणी त्यांनी मान्य केली होती त्याची फलश्रुती काय झाली हे मी आतापर्यंत तुमच्यासमोर पेश केलं.

आपल्या उणीवापण ह्या खेपेला लक्षांत येऊन गेल्या. दुर्गम डोंगराळ भागात वाहनांची न् रसदीची व्यवस्था काही आपल्याला नीट करता आली नाही, हे कबूल करायलाच हवं ही एक आपली उणीव. रणांगणावर प्रचाराची पण काहीच व्यवस्था आपल्याकडे नव्हती. ह्याच्याकरता आपण एक तुकडी खास शिक्षण देऊन तयार केलेली होती. पण पण दुर्दैवानं वाहनाची न् लाउडस्पीकरची व्यवस्था होऊ न शकल्यामुळ ह्या तुकडीचा फारसा उपयोग झाला नाही. जपानकडे आपण वारंवार लाउडस्पीकर्सची मागणी केली होती. अन् मला वाटतं, लाउडस्पीकर्स आपल्याजवळ असणं फारच आवश्यक होतं. लाउडस्पीकर्स असते तर शत्रूकडच्या भारतीय सैन्याला आपलं उद्दिष्ट कळवता आलं असतं. आपलं दुर्दैव असं की जपानी किकानकडनं आपल्याला लाउडस्पीकर्सचा पुरवठा काही होऊ शकला नाही. आता हे लाउडस्पीकर्स आपण स्वतःच तयार करतोय्. तेव्हा पुढल्या मोहिमेत ह्या मातृमुक्ती यज्ञाचं आवाहन आपल्याला शत्रूकडल्या भारतीय सैनिकांपर्यंत सहज पोचवता येईल.

नेताजींचं भाषण संपलं. नंतर बैठकीत काही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

एक म्हंजे आपलं सैन्य इथपास्नं पुढं पुरवठ्याकरता जपानी लोकांच्यावर अजिबात अवलंबून राहणार नाही. आपला स्वतःचाच पुरवठा विभाग उघडला जाईल. हे खातं परमानंदजींच्याकडे राहील.

दुसरं असं ठरलं की, इत:पर जपानी लायाझॉं डिपार्टमेंट किंवा याकुरो किकानशी आपण काहीच संबंध ठेवायचे नाहीत. थेट जपान सरकारशी टोकिओ-लाच आपण संबंध जोडू.

तिसरं असं की, अस्थायी आझाद हिंद सरकारचं एक परराष्ट्रीय खातं उघडावं. मेजर-जनरल ए. सी. चतर्जी-च्यावर हे खातं सोपवावं.

जपानमधे आपला एक वकील नेमावा असंही ह्या बैठकीत ठरलं.

पण सगळ्यात महत्त्वाचा निर्णय असा होता की, इथून पुढच्या कामात आझाद हिंद सेनेला मार्गदर्शन करण्या-करता एक युद्धसमिती बनवली गेली. ही समिती छोटीशी न् कामाचा उरक असणारी हवी. तेव्हा मोजक्याच लोकांना घेऊन ही समिती बनली. ह्या समितीत एकूण बाराजण होते. नेताजी, तीन जनरल्स—म्हंजे भोसले, चतर्जी न् एम. झेड. कियानी—-अजीज अहमद, इशान कादर, हबिबूर रहमान, गुलजारासिंग, आय. जे. कियानी न् शहानवाजखान. शिवाय दोन मुलकी सभासद—-परमानंद न् राघवन. असे बाराजण.

मध्यंतरीच्या ह्या काही महिन्यांत सेनेत नवीन स्वयंसेवक न् सैनिक भरती करण्यात आले. आयपो, कुआलालंपूर, पेनांग, रंगून न् सिंगापूरला मुलकी लोकांना लष्करी शिक्षण देण्याकरता ज्या छावण्या उघडल्या होत्या, त्या ह्या काही महिन्यात वाढवून घेतल्या. त्यामुळं आझाद हिंद सेनेतल्या सैनिकांचा आकडा चांगलाच वाढला. तो पन्नास हजाराच्या घरात गेला.

ह्याच सुमाराला—म्हंजे ऑक्टो-बरच्या सुरुवातीला—-दुसऱ्या डिव्हिजनच्या आघाडीची तुकडी कर्नल अजीज अहमदच्या नेतृत्वाखाली मलायातनं रंगूनला निघून आली. कर्नल जी. आर. नागर ह्यांच्या नेतृत्वाखाली तिसऱ्या डिव्हिजनच्या संघटनेचं काम सुरू झालं.

ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात मेजर-जनरल चतर्जी, मेजर-जनरल कियानी न् कर्नल हबीबुर रहमानला घेऊन नेताजी रंगूनहून टोकिओला गेले. दरम्यान सैन्यात प्रचंड बदल्यापण झाल्या. आमच्या एक नंबर डिव्हिजनचे कमांडर मेजर-जनरल एम. झेड. कियानींना नव्या युद्धसमितीचे जनरल सेक्रेटरी करण्यात आलं. त्यांच्या जागी कर्नल शहानवाजखान झाले एक नंबर डिव्हिजनचे कमांडर.

मंडालेच्या आसपासच्या आझाद हिंद सेनेच्या वेगवेगळ्या युनिट्सना दोनशे मैल दक्षिणेला प्यिनमाना इथं एकत्र जमवा असा आदेश नेताजींनी दिला. त्याप्रमाणं डिसेंबरच्या पहिल्या आठ-वड्यातच हे सैन्य मागं घ्यायला सुरुवात झाली. हे काम काही सोपं नव्हतं. पावलोपावली अडचणी होत्या.

एक म्हंजे—-पुरेशी वाहनं नव्हती! दुसरं म्हंजे—बॉंबर विमानांच्या जोर-दार हल्ल्यामुळं रेल्वेलायनी कुचकामी होऊन गेल्या होत्या!

शेवटी कसंतरी पंचेचाळीस सालच्या जानेवारी महिन्याच्या शेवटीशेवटी एक

नंबर डिव्हिजन प्यिनमानाला गोळा झाली. त्याचबरोबर मेमिओ न् मनिवाची इस्पितळं पण मागं आली. ह्याचवेळी भाबीजींची गाठ पडली. अर्थात् मी काही तिला भाबीजी म्हणायचो नाही, मी सुभद्राच म्हणत होतो. पण सुभद्रेचं हे 'भाबीजी' नाव एवढ्यात सगळीकडे पसरलं होतं. सगळेच तिला भाबीजी म्हणायचे. अन् तरी सगळ्यांनाच तिला भाबीजी म्हणायचं कारण माहीत होतं असं काहीच नाही !

दरम्यान नेताजी टोकिओहून परतले. जपान सरकारनं नेताजींचे सगळेच प्रस्ताव मान्य केले. नंतर दोन नंबर डिव्हिजनला पोपा-भागात लढायला पाठवलं. मी न् अन्वरभाई जरी का एक नंबर डिव्हिजनमधे होतो, तरी पोपा पहाडाच्या लढाईकरता आम्हाला दोघांनाही बदलून दोन नंबर डिव्हिजनमधे घातलं. त्यालाही एक खास कारण होतं.

टोकिओहून परत आल्यावर नेताजी परत एकदा रणांगणावर सगळं काही स्वतःच्या डोळ्यांनी बघायला फिरले. आमच्या एक नंबर डिव्हिजनचं नवं हेडक्वार्टर्स प्यिनमानाला होतं. अन् दोन नंबर डिव्हिजन मलायातनं रंगूनला आली होती गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरमधेच—हे मी आधीच सांगितलंय्. दरम्यान् त्यांचं हेडक्वार्टर्स काउकपाडांगला न् पोपाला उघडलं होतं. डिव्हिजनल कमांडर अजीज अहमद दुदवानं प्रवासाला निघायच्या तोंडालाच बाँबच्या स्फोटानं जखमी झाले. त्यांना इस्पितळात पाठवावं लागल.

त्याच्यामुळं नेताजींनी परत एकदा बदलीचा हुकूम जारी केला. एक नंबर डिव्हिजनचे कमांडर होते कर्नल शहानवाजखान. त्यांना दोन नंबर डिव्हिजनचे कमांडर म्हणून पोपा पहाडात जायला सांगितलं. कर्नल शहानवाजखान म्हंजे पहिल्या श्रेणीचे अधिकारी होते. नेताजींच्या अत्यंत विश्वासातले. नेताजी त्यांना थट्टेनं म्हणायचे—तू तर माझ्यापेक्षा एकाच दिवसानं लहान आहेस. शहानवाजखानची जन्मतारीख होती २४ जानेवारी. खरंतर ते नेताजींच्यापेक्षा सतरा वर्षं न् एक दिवसानं लहान होते.

एक नंबर डिव्हिजनमधल्या सैनिकांच्या तब्येती अगदी बिघडल्या होत्या. बहुतेकच जणांना काही-ना-कांही झालेलं. शिवाय शंभरातल्या वीस जणांच्याकडेच शस्त्रं होती न् तीही अगदी मामुली ! त्याच्यामुळं नेताजींनी एकतीस वर्षांच्या ह्या तरण्याबांड ऑफिसरलाच नव्या रणांगणावर पाठवावं, ह्यात तसं आश्चर्य काहीच नव्हतं.

शहानवाजखान नव्या आघाडीकडे निघाले. एक नंबर डिव्हिजनमधल्या काही निवडक सैनिकांना बरोबर घेऊन जावं असं त्यांच्या मनात होतं. पण इतकी वाहनं नव्हती. म्हणून एका कंपनीनं पायी त्यांच्या मागोमाग जावं असं ठरलं. आमचं नशीब चांगलं म्हणून ह्या निवडक सैनिकात आम्हीपण होतो. आम्ही म्हंजे मी न् अन्वर. त्यात परत माझं नशीब अन्वरपेक्षाही मोठं. मी त्यांच्याचबरोबर जीपनं गेलो. लेफ्टनंट

अन्वर हुसेन नंतर आला.

आज -- म्हंजे १९६५ साली -- ब्रिगेडियर अन्वर हुसेन माझ्या शत्रु-पक्षात आहे. म्हणूनच इथं एक गोष्ट सांगून ठेवतो. मी कर्नल शहानवाज-खानच्याबरोबर जीपनं गेलो न् अन्वर नंतर पायी आला असं मी आत्ता सांगितलं. पण त्याचा अर्थ काही असा नाही की मी अन्वर हुसेनपेक्षा निधडा सैनिक आहे असं शहानवाजखानचं मत होतं. नाही, तस काहीच ह्या निवडी-मागं नव्हतं. धाडस, शौर्य, आत्मत्यागाची प्रेरणा, किंवा सैनिकाचे आणखी काहीही गुण -- कुठल्याच बाबतीत अन्वर माझ्यापेक्षा कमी नव्हता. पण तसा काही मुद्दाच नव्हता. शहानवाजखाननी मला का बरोबर घेतलं त्याची एक गोष्टच आहे.

म्हंजे त्याचं असं झालं--

मिकटिल्याहून जाताना नेताजींना घेऊन जाव प्यिनमानाला असं शहानन-वाजखाननी ठरवलं. नेताजींच्याबरोबर त्यांचा पर्सनल स्टाफ न् बॉडीगार्डस मिळून वीसजण होते. तर आम्ही सगळे मिकटिल्याहून निघालो प्यिनमानाकडे मी न् अन्वर आम्ही दोघंही होतो ह्या टोळक्यात.

फेब्रुवारीच्या वीस तारखेला मिक-टिल्याच्या दक्षिणेला वीस मैलांवर असलेल्या इंदो नावाच्या गावी आम्ही येऊन पोचलो. त्यादिवशी आम्ही तिथंच मुक्काम ठोकला. दिवसभर विमानहल्ले चालू होते. त्यामुळं दिवसा-उजेडी मोटारी रस्त्यावर काढणं शक्यच नव्हतं. रात्रीच्या वेळीदेखील दिवे न लावता सावकाश जावं लागत होतं आम्हाला.

आमचा मुक्काम ह्या इंदो गावात असतानाच आम्हाला खबर मिळाली की शत्रूनं पोकोकूजवळ इरावती नदी ओलांडल्याय् म्हणन. अन् पागानमध्ये असलेल्या आमच्या नेहरू ब्रिगेडची फळी त्यांनी मोडून काढलीय्.


ह्या चार नंबर नेहरू ब्रिगेडचे कमां-डर होते मेजर जी. एस्. धीलन. म्हंजे त्यांची परिस्थिती कठीण झालेली असणार. शत्रुसैन्यानं धीलनच्या ब्रिगेड-वर प्रचंड हल्ला चढवला. अन् आमचं बरंच सैन्य मारून शत्रू आता मिक-टिल्याकडे कूच करत होता.

ही बातमी ऐकून नेताजी फारच बेचैन झाले. म्हणाले-- तर मग आपण इंदोहून तडक मिकटिल्याला परतावं हे बरं. ब्रिटिश सैन्यानं आपली फळी जिथं मोडली असेल, ते भगदाड लगेच बंद करून टाकायला हवं ताबडतोब.

शहानवाजखान म्हणाले--पण सर असं प्रत्येक रणांगणावरचं प्रत्येकच संकट काही तुम्ही जातीनं हजर राहून थांबवू शकणार नाही ! शत्रूला थोपव-ताना कर्नल धीलन समजा कामी आले तर तुम्ही-आम्ही काय करणार ?

पण नेताजी काहींच ऐकायला तयार नव्हते. एकदा त्यांच्या मनानं घेतलं की ते काही केल्या बदलायचे नाहीत. शेवटी नाईलाजानं आम्ही सगळे मिकटिल्याला परत आलो.

तिथं आल्यावर सविस्तर बातमी कळली. लढाईची अवस्था भलतीच



उ
नकाशा नं ४
मनिवा
मेमिओकडे
मंडाले
सागई
आभा
मियथा
मिजान
ओकोकू
टांउदा
इंडाले
माहेले
प्यिनबिन
प्यांगू
पागान
ताउंगजिन
धाऊ
लेगी
पोपा
काऊक पाडांग
मिक्टिला
मलेई
उनविन
थाजि
इंदो
प्यॅबी
इमेथिन
येनानजांग
रेल्वे
रस्ता
स्केल : १ इंच = अंदाजे २४ मैल

गोंधळाची होती. काउक्समधे तेव्हा जोराची लढाई चालू होती. मंडालेवर शत्रूचा कब्जा होता. मंडाले शहर म्हंजे कचऱ्याचा प्रचंड ढिगारा झाला होता. ब्रिटिश सैन्यानं मंडालेत पाऊल टाकायच्या आदल्या दिवशी चिक्कार विमानांनी शहरावर कार्पेट बॉबिंग केलं होत. त्यामुळं मंडालेचा जुना किल्ला—जिथं खूप मागं नेताजींना अटकेत ठेवलं होतं—तो संबंध किल्लाच जमीनदोस्त होऊन गेला होता. मंडाले-हिलवर सुंदर-सुंदर पॅगोडा होते. तेपण ह्याच्यांतनं बचावले नव्हते. मंडालेत जपानी सैन्यानं शौर्याची शर्थ केली होती, ही कबुली ब्रिटिशांनीदेखील दिलेली आहे. पण तरी अखेर शेवटी शहर पडलं.

शहराचा कब्जा मिळाल्यावर सज्ज गाड्या न् रणगाडे घेऊन ब्रिटिश सैन्य मंडाले–मिकटिला-रंगूनच्या रस्त्यानं दक्षिणेकडे निघालं होतं. मंडालेच्या टापूत जे काही जपानी सैन्य लढत होतं, तेपण पुरतं मोडकळीला आलं होत. शिवाय मिकटिल्याच्या पश्चिमेला इरावती नदी पार करून ब्रिटिश सैन्याची आणखी एक तुकडीपण मिकटिल्याच्या रोखानंच येत होती. मिकटिला म्हंजे सडकांचा नाका होता. अन् रेल्वेपण होती तिथं. त्यामुळं मिकटिल्याला लष्करी महत्त्व फार होतं. म्हणूनच मिकटिल्याचा ताबा घ्यायला ब्रिटिश सैन्याचे एवढे प्रयत्न चालले होते.

अशा परिस्थितीत नेताजींनी इथं—म्हंजे मिकटिल्यात—क्षणभरही थांबू नये असं डिव्हिजनल कमांडरचं म्हणणं होतं. मिकटिल्याचं रक्षण करायचा काहीच बंदोबस्त नव्हता. आधी केलेला होता, तो शत्रूनं मोडून काढला होता. तेव्हा डिव्हिजनल कमांडरनी नेताजींना स्वच्छ शब्दात सांगितलं—तुम्ही इथं राहून चालायचं नाही!

नेताजींनी विचारलं—इथनं धीलनचं युनिट किती अंतरावर आहे?

—ते इथनं चाळीसेक मैलांवर येईल. पश्चिमेला. पोपाच्याजवळ. गावाचं नाव आहे काउक-पाडांग.

—तर मग माझी तिथं जायची व्यवस्था करा! धीलनला काही तोंडी सूचना देऊन मी परत येईन!

कर्नल शहानवाजखान म्हणाले—ते तर शक्यच नाही! मेजर धीलनचं ब्रिगेड शत्रुसैन्याच्या जास्तीच जवळ आहे! ह्या परिस्थितीत तुम्ही तिथं जाऊन चालणार नाही!

नेताजी म्हणाले—नाही! इथनं परतायच्याआधी मला काउकपाडांग न् पोपाची हालत काय आहे ते कळायलाच हवं! मला तिकडे जायलाच पाह्यजे!

कर्नल शहानवाजखान काकुळतीला येऊन म्हणाले—ठीक आहे. तर मग आत्ता तुम्ही 'कालव'ला जाऊन तिथल्या इस्पितळाची पहाणी करा. तिथं जखमी होऊन पडलेल्या सैनिकांना तेवढाच धीर येईल. मी पोपा अन् काउकपाडांगला स्वत: जाऊन अट्ठेचाळीस तासांच्या आत तुम्हाला तिथली सगळी बातमी देतो! मग मात्र तुम्ही एका मिनटाचापण उशीर लावता कामा

नयेत ! तसं वचन द्या मला !

नेताजी हसले.

शहानवाजखानंनी एक सुस्कारा टाकला, अस्फुट आवाजात ते म्हणाले— नेताजी, चाक उलटं फिरायला लागलंय् बहुतेक ! लढाईची एकदर परिस्थिती बघून वाटतंय् की इथली—ब्रह्मदेशातली आपली लढाई संपली आता ! अन् तेवढंच नाही—जपान–जर्मनीचा अखेरचा पाडावदेखील अटळच वाटतोय् आता !

तात्काळ नेताजी म्हणाले—मग ? म्हणून काय झालं ? म्हणून काही आपण शरणागती स्वीकारणार नाही ! वेळ आली तर पन्नास हजार सैनिक जिवात जीव असेपर्यंत लढत राहतील ! रणांगणातच प्राण वेचतील !

शहानवाजखान म्हणाले—मृत्यूला कवटाळायची भीती आझाद हिंद सेनेच्या कोणत्याही सैनिकाच्या मनातही नाही ! पण नेताजी, ह्या रक्ताच्या बदल्यात काही स्वातंत्र्य मिळायचं नाही ! आपला पराजय काही काळजाच्या रक्तानंही आपल्याला थोपवता यायचा नाही !

नेताजी खंबीरपणानं म्हणाले—ही तुझी चूक आहे, शहानवाज ! शहीदांच्या काळजाचं रक्त कधीच वाया जात नसतं ! ह्या रक्ताच्या पुरानं ब्रिटिश साम्राज्याचा पायाच खचून जाईल ! लढाई संपल्यावर ब्रिटनला काही केल्या दाबून ठेवता यायचं नाही भारताला ! आपण जो दृष्टांत ठेवून जाऊ, त्याची ठिणगी सबंध भारताच्या दारूगोळ्याला बत्ती देईल ! भारत स्वतंत्र होणारच !

मग ही लढाई आपण जिंकू दे, नाहीतर हारू दे ! फक्त आपण आदर्शापास्नं भ्रष्ट व्हायला नको !

शहानवाजखान थोडावेळ गप्पच बसले.

मग खालच्या आवाजात म्हणाले— नेताजी ! तुम्ही जादू करता ! क्षणभरच आधी निराशेनं माझं मन खचून जात होतं ! पण मात्र वाटतंय्— बरोबरच आहे की हे ! हारजीत काही विशेष नाही ! पण आपण व्रत सोडता कामा नये ! आपण व्रत सोडलं नाही तर आपली अखेरची इच्छा—म्हंजे भारताचं स्वातंत्र्य—ही इच्छा सफल होणारच !

[ क्रमशः ]

## फाशीच्या दोरीला शिवून आलेले वीर

पृष्ठ १८ वरून

काऱ्यांना त्यांचं सोयर-सुतक नव्हतं. जास्तीत-जास्त धान्य कसं जमविता येईल एवढंच ते पाहत होते. खरं म्हटलं तर ते वर्ष नापिकीचं होतं. त्याच्यापूर्वीच अलीगढ मुस्लीम युनिव्हर्सिटीसाठी सक्तीचा फंड वसूल करण्यात आला होता. यामुळे लोक आधीच हैराण होते. त्यातच लेव्ही वसूलीचा वरवंटा त्यांच्यावर फिरू लागला. तरीही पुरेसं धान्य मिळेना.

नांदेडच्या तालुकदारीत (जिल्हा कार्यालयात) अधिकाऱ्यांची बैठक भरली होती. अपेक्षीत प्रमाणात धान्य गोळा न झाल्याबद्दल तालुकदार साहेब (जिल्हाधिकारी) जाम भडकले होते. खालच्या अधिकाऱ्यांच्या नालायकीचा त्यांनी उद्धार केला. उद्दिष्ट पूर्ण न झाले तर तुमची खैर नाही, असं त्यांना सुनावलं आणि प्रत्येक तहसीलदारानं अधिका-अधिक धान्य जमविण्याबद्दल सक्त ताकीद दिली व बैठक संपली. श्री. रामराव नावाचे कामस्थ गृहस्थ नांदेडचे तहसीलदार म्हणून नुकतेच आले होते. परवरदिगारचे पक्के वफादार म्हणून त्यांचा लौकीक होता. आपण एवढं जीव तोडून काम करीत असताना साहेबानी आपल्याला एवढा दोष द्यावा याचा त्यांना राग आला. त्यांनी नायबसाहेब, गिरदावर, परवारी, यांना बोलावलं आणि दुष्ट जोरानं शिव्या घातल्या. 'तुमच्या कामचोरपणामुळे आपल्याला हुजूरसाहेबापुढे मान खाली घालावी लागली हे संतापानं सांगितलं लेव्ही न देणारं एखादं मक्कार खेडं हुडकून काढा. आताच त्याच्यावर धाड घालू. असा हुकूम दिला. गिरदावरनं किर्द पाहून इजळी हे तसं मक्कार खेडं असल्याचं दाखवून दिलं अन् मोठ्या सरंजामासह तहसीलदारांनी इजळीकडे कूच केलं. मे महिन्याचा मध्यान्ह होता. जमीन भयंकर तापलेली. शुष्क धुळीचे लोट हवेत उडत असताना अचानक साहेबांच्या बैलगाड्या १०–११ च्या सुमारास इजळीच्या वेशीजवळ येऊन ठेपल्या. चपराशानं पाटलाच्या दाराशी जावून आरोळी ठोकली. 'पटेल बाहर आव, सरकार तशरीफ लाये है'

आवाज ऐकताच पाटलाच काळीज लक्कन् हललं. खरं तर काही दिवसापूर्वीच धान्य वसूली झाली होती. आपल्या शक्तीप्रमाणे लोकांनी धान्यही दिलं होतं. मग येरवाळीच सरकार कसं आले? कोणतं संकट पुढं वाढून ठेवलं आहे? तेवढ्यात गाड्या वाड्यापुढे आल्याच. फेटा अर्धवट बांधलेल्या स्थितीतच पाटलांनी कुर्निसात केला. पण आज साहेबांचा नूर काही और होता. आल्या-आल्याच त्यांनी शिव्यागाळीला सुरुवात केली. गाववाल्यांचे माय-बाप उद्धरले. ते किती हराम व बेवफा आहेत ते सुनावलं. पाटलाने थोडा आराम करण्याची केलेली सूचना

धुडकावून देवून सारा गाव गोळा करण्याचा हुकूम दिला.

तहसीलदार साहेबांचा ताल पहातच पाटील हबकलेच. त्यांनी महारांना बोलावून घेतलं व गाव गोळा करण्यास सांगितलं. पण यावेळी गावात कोण असणार. पाणकळा जवळ आलेल्या, भुईनांगर करण्याचं काम उरकावयाचं होतं. प्रत्येक शेतकरी शेतात राबत होता. इकडे साहेब थैमान घालीत होता. समोर दिसल त्यांच्या अंगावर धावून जात होता. त्यांना थपडा-बुक्या लगावीत होता. लोकांना हा काय प्रकार आहे ते समजेना. गावात फक्त पाटील व म्हातारे लोक होते. बोलावून आणलेले ४–२ बाप्येही दूरवर उभे होते. तहसीलदार अंगात आल्यासारखा घुमत होता. 'ज्वारी लाव ज्वारी' असं ओरडत होता. धीर करून पाटील जवळ गेले. हात जोडून म्हणाले, 'सरकार, गावानं लेव्ही घातली आहे. आमच्याकडं आता बाकी नाही. आम्ही आपल्या हुकमाची अम्मलबजावणी पूर्वीच केली आहे.' 'हरामजादे' तहसीलदार गरजला. 'हुक्मतला अजून ज्वारी हवी आहे. तुम्ही हरामखोरांनी घरात लपवून ठेवली आहे. घ्यारे ह्यांच्या घरादारांची झडती घ्या'

तहसीलदारसाहेबांचा हुकूम बाहेर पडताच चपराशी, गिरदावर धावले. घराघरातून तलाशी सुरू झाली. भांडीकुंडी बाहेर फेकली जावू लागली. माठ रांजण ठोकरले जावू लागले. खाण्यासाठी ठेवलेली पसाभर ज्वारीही बाहेर आणून सरकार जमा होऊ लागली पाटलांना ब्रह्मांड आठवलं. आधीच वर्ष वाईट, त्यात लेव्ही चुकती केलेली, आता ही लुटमार झाली तर लोकांनी काय करायचं. तरणी-ताठी मंडळी शिवारातून पांगलेली. गावात सोबत नाही. सरकारी माणसाचा जुलूम झाला. त्यांनी आज विवेक गुंडाळूनच ठेवला होता. बायका-पोरांच्या अंगावर हात टाकण्यात त्यांनी कमी केलं नाही. घरात सरकारी लोक घुसलेले पाहून लक्ष्मणाची बायको रडत बाहेर पळाली. तहसीलदार तिला पाहतच ओरडले. 'पकडो-सालीको. ज्वारी नही देती है लो उसकी साडी खिंचो' सारं गाव थरारलं. तरुणांचं रक्त उसळलं. त्यानीच तहसीलदाराच्या नरडीचा घोट घेण्यासाठी त्यांचे हात शिव-शिवू लागले. वास्तविक या गावाची शांत वृतीचं गाव म्हणून ख्याती होती. मारा-माऱ्याचे प्रसंगही क्वचीत येत. पण स्त्रियांच्याच अब्रूवर धाड आलेली पाहून त्यांचं मन संतापून उठलं. ते आतल्या आत फुंदू लागलं.

तहसीलदाराची त्या दिवशी घटका भरणार असल्याचं नियतीनं लिहून ठेवलं असावं. त्याला आवर असा नव्हताच. नशा चढलेल्या माणसाप्रमाणं त्यानं जुलमाची तार आणखी आणखी ताणण्याचं धोरण अनुसरलं. साऱ्या गांवावर जप्ती आणल्याचे त्यानी जाहीर केले. पाटलांना आता काय करावं ते सुचेना. शेवटी त्यांना युक्ती सुचली. साहेब जुलमी असले, सल्तनतीचे वफा-

दार असले तरी हिंदू आहेत. पूज्य व्यक्तीबद्दल त्यांनाही आदर-भाव असेल असे त्यांना वाटले. मनाचा काहीतरी निश्चय करून ते बाहेर पडले. ते थेट कोंडीबादादाच्या घरी.

कोंडीबादादा व माणीकदादा हे गावातील दोन वृद्ध गृहस्थ. धार्मिक, सात्विक म्हणून त्यांची ख्याती होती. गळ्यात तुळशीमाळ, तोंडात पांडूरंगाचं नाव. कुणी चुकलं-माकलं तर हे दोन महापुरुष त्यांना समजावीत, आईच्या मायेनं पाठीवरून हात फिरवून त्यांना हितोपदेश करीत. लोक चटकन आपली चूक कबूल करून त्यांच्या पायाशी लीन होतं. 'का येंणं केलं लेकरा' पाटलांना त्यांनी विचारलं. 'काका, गावावर सुलतानी संकट आलंय, तहसीलदार लयी कोपलाय, डब्बल लेव्ही द्या म्हणालाय – गावात त्यानं कहर माजवलाय. तो कुणालाच ऐकनासं झालाय' पाटलानं भरल्या गळ्यानं परिस्थिती सांगितली.

'पांडूरंग-पांडूरंग' असा कसा रे, कावला त्यो. अखर मानुसच की न्हाय त्यो. चल त्याला समजावू.

दोन्ही वृद्ध पुरुष उठले. हातातील काठी टेकवीत निघाले. कोंडीबादादा व माणिकदादांना पाहताच लोक आदरानं बाजूला सरकले. त्यांच्या थरथरत्या हाताला तरुणांनी आधार दिला. त्या आधाराने ते पायऱ्या चढले. तहसीलदार साहेबापुढे उभे राहीले. दोन सात्विक पुराण-पुरुष सत्तेच्या प्रतिनिधीच्या समोर उभे होते. त्यांनी तहसीलदारांना हात जोडले. 'सरकार आपला काय हुकूम आहे.'

तहसीलदार अजन घुश्यातच होता. त्याला समोरच्या म्हाताऱ्यांच्या चेहऱ्यावरील सात्विक भाव दिसत नव्हते. त्याला फक्त दोन खातेदार दिसत होते. 'जवारी लाव' तो ओरडला, कहां दबाके रखी है निकालो 'हराम जादो' तो ओरडला.

सारे गावकरी दचकले. दिवस अस्ताला जात होता. गावाने पूज्य मानलेल्यांचा असा पाणउतारा यापूर्वी कुणीच केला नव्हता. पण त्या वृद्धांना त्याची क्षिती नव्हती. व्यक्तीगत राग-लोभाच्या ते पलीकडे गेलेले होते. ते पुन्हा अजिजीने म्हणाले, 'सरकार चुकलं-माकलं माफ करा. होतं नव्हतं ते तुमच्या पायाशी आणलं. आता प्रजेला छळू नका' एवढे म्हणूनच ते थांबले नाहीत तर त्यांनी खाली वाकून चक्क साहेबांच्या पायावर डोकं ठेवलं. वारकऱ्याच्या कपाळाचा अबीर-बुक्का तहसीलदारांच्या बुटावर उमटला.

'बाज हट बुढ्ढे' तहसीलदार कडाडले. त्यांनी दोघांनाही लाथेनं उडवलं 'पहले जवारी लाव, ये नकरे बादमे करो'. आता मात्र कहर झाला. लोकांचा धुमसलेला संताप बाहेर उमटू लागला. मुठी वळल्या जावू लागल्या. नजरेत अंगार जमू लागला. जमावाची चलबिचल तहसीलदारांच्या चपराशाच्या नजरेस आली. साहेबाचं जरा चुकतं, त्यांच्याकडून ज्यादती झाली. हे त्याच्या लक्षात आलं. तो गडबडला. प्रसंगावधान राखून तो पाटलांना म्हणाला, 'पटेल

दिन डुबने को आया साब के खाने-पिनेका इंतजाम करो '

अजिलास संपला. धान्य जमविण्यात अपयशी ठरलेले तहसीलदार घुश्श्यातच जेवले. दुसरे दिवशी पुन्हा प्रयत्न करण्याचं त्यांनी ठरवलं.पण गावकरी बिथरलेले चपराशाच्या लक्षात आलेले होते. साहेबानं तिथं मुक्काम ठेवणं धोक्याचं आहे, असं त्याला वाटलं. पाटलांना सूचकपणे त्यानं सांगितलं. पौर्णिमेची रात्र होती. रात्री ९ वाजता तट्ट्या लावलेल्या बैलगाडीतून तहसीलदार साहेबाची रवानगी चिकाळ्याकडे झाली. आपण उद्याच परत येणार असल्याची ताकीद देवून बैलगाडी हलली. दोन महार गाडीपुढे रवाना झाले होते. जड जेवणाने सुस्तावलेल्या साहेबाचा गाडीत डोळा लागला होता. मऊ गादीवर तक्क्याला टेकून साहेब घोरू लागले. गाडी–चिकाळा ओलांडून रोही, पिंपळगावाकडे निघाली, पिंपळगाव ओलांडून कवठ्याचा अर्धा रस्ताही कापला. ती एका पांदीजवळ आली अन् एक कर्कश शिळ रानात घुमली. झाडावरील दोन पाखरं दचकून जागीच उडाली व पुन्हा गप्प बसली. काय होतय हे समजण्यापूर्वीच गाडीवर दगडाचा मारा सुरू झाला. तट्ट्यावर थाड-थाड धोंडे आदळू लागले. २०–२५ लोक रस्ता अडवून उभे असल्याचं पाहताच गाडीवाल्याची बोबडी वळली. त्याने गाडी परत चिकाळ्याकडे वळविली. बैलाला दामटलं पण आता घटका भरत आली होती. लोकांनी पळत येवून बैलाचे कासरे धरले. त्यांनी बैल जुवा-पासून वेगळे केले. गाडीवाला उडी मारून पळून गेला. जमावानं गाडीवर हल्ला केला. लाठ्या मारून तट्टा उध्वस्त केला. भयाने गारठलेला तहसीलदार व अजमोद्दीन नावाचा चपराशी सापडला. त्यांच्यावर सपा-सपा सुरे चालविले गेले. थोड्याच वेळात मारेकरी काम संपले असे समजून फरार झाले. या हल्ल्यातून बचावलेल्या गाडीवाल्याने चिकाळ्याला ही भीषण वार्ता दिली. रातो-रात गावकरी तेथे गेले. चपराशी तेथेच खतम झाला होता. साहेबात थोडी धुग-धुगी होती. त्यांना नवारीच्या पलंगावर घालून नांदेडकडे रवाना केले. पण दवाखान्यात मृत्यूपूर्व जबानी झाल्यावर साहेब मरण पावले. एका जुलमी अधिकाऱ्याचा सूड पूर्ण झाला. निजामी राजवटीत सरकारी अधिकाऱ्याचा पाडलेला हा पहिला बळी !

निजामी राजवटीला हे आव्हान सहन झाले नाही. एका अधिकाऱ्याला लोक जिवे मारतात म्हणजे काय ? अशाने सल्तनतीचा बोज कसा राहणार. ६० पोलीसांची एक तुकडी इजळीला रवाना झाली. इजळी, चिकाळा, आदि गावातून तिने थैमान घातले. गावावर सात हजार रु. दंड बसविण्यात आला. खूनी कोण, त्यांचे साक्षीदार कोण ? सुडाचा वरवंटा सुरू झाला. संशयावरून कुणालाही पकडावे, मारठोक करावी, गुन्हा कबूल कर म्हणून जबरदस्ती व्हावी असे होवू लागले. श्री. नारायण पैतवार कोमटी हे या गावा-

तील सावकार. त्यांनाही पोलीसांनी मारठोक केली. या कटाचा प्रमुख रामजी माणीका हा २०-२५ वर्षांचा तरुण त्याला निरपराध्यांना होणारी मारठोक पहावेना.आपल्या साथीदाराला तो म्हणाला 'मी गुन्हा कबूल करतो लोक तरी वाचतील? पण सावकार म्हणाले 'असं करू नकोस गड्या' आम्ही कुणाचं नाव सांगत नाही. तूही कबूल होवू नकोस. गुन्हा असलाच तर आपल्या सर्वांचा आहे. निदान आमच्या भावना तरी तुझ्यापेक्षा वेगळ्या नव्हत्या !

पण फितूर लोक सगळीकडेच असतात. कटवाल्यापैकी, चाफा बाबा याने सारी हकीकत पोलीसांना सांगितली. मग काय पाहता, पोलीसांनी पाहता-पाहता २२ जणांना अटक केली. खूनाचा आरोप लावून त्यांना ठाणबंद केले. खटल्याची तयारी सुरू झाली.

धर्माबादचे एक गांधीवादी नेते श्री. गोविंदराव पानसरे यांना हकीगत समजताच ते आरोपीच्या साह्याला धावून आले. निजामास त्यांनी एक परखड पत्रक लिहिले. सरकारी अधिकाऱ्यांच्या जुलमाचा पाढा त्यात त्यांनी वाचला. या जुलमामुळेच लोक या प्रकारास प्रवृत्त झाले. त्याला जबाबदार अधिकारीच आहेत. अशा परिस्थितीत कुणीही तेच कृत्य केले असते जे आरोपींनी केले. मी मनोमन त्यांच्या कृत्याशी सहमत असल्याने-सरकारने आपल्यालाही अहिंसक गुन्हेगार मानून त्यांच्याबरोबर, आपला खटला चालवावा असं त्यांनी सुनावले. पानसऱ्यांच्या पत्राने सरकार चिडले, तर लोक चेतावले. याच लेखावरून सरकारने त्यांच्यावर खटला भरला. जामिनावर सुटून धर्माबादला जात असताना रझाकारांनी त्यांचा वध केला. श्री. पानसरे यांच्या हौतात्म्यामुळे चळवळीला धार आली. त्यातून उमरी बँक ऑपरेशन व इतर गौरवशाली प्रसंग घडले. अिजळीच्या तहसीलदाराच्या खूनातून सुरू झालेली लढ्याची परंपरा ही अशी आहे. (ऑपरेशन उमरी बँक हा लेख माणूसच्या ११ सप्टेंबर १९७१ च्या अंकात हुतात्मा पानसरे यांच्यावरील लेख दि. २ ऑक्टोबर १९७१ च्या अंकात प्रसिद्ध झालेले आहेत.)

त्यावेळी नांदेडला सेशन्स कोर्ट नव्हते. औरंगाबादहून स्पेशल जज्ज नेमण्यात आला. सरकारला फारसे साक्षीदार मिळाले नाहीत. परंतु माफीच्या साक्षीदाराचे बयान प्रमाण मानून कोर्टाने खालीलप्रमाणे सजा ठोठावली.

आरोपी नं. १. रामजी माणिका २. भुजंगा पांडूजी सुतार, ३. भुजंगा विठोबा, ४. बापुराव गोविंदराव, (पोलीस पाटील) यांना फांशीची शिक्षा. आरोपी नं. ५. दत्तु माणिका, ६. लक्ष्मण किसन, ७. गणपती पर्वता, ८. तानाजी नागोबा, ९. चाफा पुंजाजी, १० शामराव कृष्णाजी, ११. गणा तानाजी, १२. नागा भुजंगा यांना प्रत्येकी २० वर्षे (जन्मठेप) आरोपी नं. १३. चाफा बाबा (माफीचा साक्षीदार म्हणून सुटका) आरोपी नं. १४. नारायण तुकाराम पैतवार, १५. दारकुजी हनमंता, १६. इरबा नागोबा, १७. ठकोजी जळबाजी, १८. भुजंगा




युद्ध जिंकूनि त्यांनी
आणियली स्वतंत्रता
अधिक चांगल्या भारतासाठीं
घडवूंया क्रांति
आता

72/584 MAR

रामजी १९. बाबा राजाराम, २०. दारकुजी कृष्णाजी, २१. अमृता आबाजी, २२. तानाजी कोंडजी प्रत्येकी १० वर्षे शिक्षा.

आरोपीच्या वतीने हैद्राबादला अपील करण्यात आले. ते फेटाळण्यात आले. परंतु निजाम रियासतीत कुणाला सहसा फाशी दिले जात नव्हते. त्यामुळे फाशीवाल्यांची शिक्षा ३० वर्षांच्या कैदेत रूपांतरीत झाली. शिक्षेचे शिक्कामोर्तब झालेले गुन्हेगार आपल्या शिक्षा भोगण्यासाठी रवाना झाले. इकडे स्वातंत्र्य चळवळ भडकली. भारत सरकारने पोलीस अॅक्शन केली व हैद्राबाद मुक्त झाले. जे. एन. चौधरी यांची मिलटरी हुकूमत सुरू झाली. सारे राजकीय कैदी मुक्त झाले. निरनिराळ्या राजकीय गुन्ह्यात ज्यांना सक्तमजुरीच्या शिक्षा झाल्या तेही सुटले. परंतु इजळीचे लोक तसेच राहिले. स्वातंत्र्यानंतरही आपल्याला का अटकावन ठेवले ते त्यांना समजेना. आपण तहसीलदारांना मारले ते काही व्यक्तीगत आदावतीने नव्हे, तर जुलमी जनतेचा प्रतिनिधी म्हणून. मग आपण खूनी कसे? तसे पाहिले तर बहुतेक स्वातंत्र्यवीर याच मालीकेत बसतील. त्यांनी ज्युडिशिअल कमिटीकडे अर्ज गुदरला. पण हा निव्वळ खुनाचा प्रकार असून राजकीय नाही असा त्याने निकाल दिला. जे. एन्. चौधरी यांच्याकडे अर्ज गेला असता त्यांनी मुलकी राजवट आल्यावर पाहू म्हणून टाळून दिले. लवकरच मिलटरी गव्हर्नमेन्ट संपून श्री. के. एम. वेलोडी यांच्या प्रमुखात्वाखाली मुलकी सरकार आले.

आता कैद्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या. आपल्यावरील अन्यायाकडे शासनाचे लक्ष वेधावे म्हणून हैद्राबाद जेलमध्ये त्यांनी ५ दिवस भूक हरताळ केला. स्टेट काँग्रेसचे आर्य समाजी नेते पंडित नरेंद्रजी यांनी या लोकांची कैफियत वेलोडींपर्यन्त पोचविली. पण राज्यात सुव्यवस्था स्थापन करण्यात गढलेल्या वेलोडीना या प्रकाराकडे पाहण्यास सवडच सापडली नाही. १९५१ मध्ये निवडणूक झाली. श्री. दिगंबरराव बिंदूकडे गृहमंत्रीपद आले. नांदेडचे एक श्रेष्ठ नेते आमदार गोपाळशास्त्री देव यांनी या कैद्यांच्या प्रश्नाला पुन्हा चालना दिली. शासनाने या प्रकरणाचा विचार करून तहसीलदाराच्या खुनाची बाब ही राजकीय घटना होती, हे कबूल केले व त्यांच्या सुटकेचा हुकूम दिला. त्याप्रमाणे १३-१२-१९५२ रोजी त्यांची गुलबर्ग्याच्या जेलमधून सुटका झाली. फाशीच्या दोरीला शिवून हे वीर जिवंतपणी आपल्या लोकात परत आले.

हैद्राबाद स्वातंत्र्य चळवळीचा साग्रइतिहास जेव्हा लिहिला जाईल तेव्हा इजळीच्या वीरांना अग्रपूजेचा मान द्यावा लागेल. परंतु आज मितीला सर्व लोक त्यांना विसरले आहेत. शासकीय निर्णय हाती असतानाही त्यांना स्वातंत्र्यसैनिक मानून साधी सन्मान पत्रेही मिळाली नाहीत. मग वर्षासन दूरच राहिले. २२ जणांपैकी, ६ आज हयात नाहीत. या लोकांनी सर्व शिक्षा भोगली असती तर शिक्षेतील सूट धरून ते यावर्षी सुटले असते. स्वातंत्र्य महोत्सवी वर्षात त्यांच्या कार्याचा गौरव शासनाने करणे उचित ठरेल.

● ● ●

## क्रीडांगण

एका काटा जोड कुस्तीची कथा

# चंबा मुतनाळ X दीनानाथसिंह

डॉ. नरेंद्र दाभोळकर

बऱ्याच दिवसाने भरत असलेले, अनेक दिवस गाजत असलेले महाराष्ट्रातील आजच्या प्रमुख कुस्तीगीरांच्या काटा जोड कुस्तीचे मुंबईचे मैदान निकाली ठरले. कुस्तीशौकिनांना चटकदार कुस्तीचे समाधान लाभले नाही, तरी बकटे धरून आणून केलेल्या एकतर्फी कुस्त्या, मोठ्या पहिलवानांनी खऱ्या खोट्या कारणांनी परंतु थपडाथपडी करत मैदानाबाहेर अर्ध्यातच काढलेला पळ, अथवा नुसत्याच मधून खेळून निकाली न होणाऱ्या कुस्त्या हा मुंबई मैदानाचा बदलौकिक तरी यामुळे धुवून निघाला.

मोठी मैदाने आणि मोठे पहिलवान ह्या दोन्ही गोष्टी तांबड्या मातीची अभिमानास्पद परंपरा सांगणाऱ्या महाराष्ट्रात आता दुर्मिळ होत आहेत. मोठे मैदान भरवावयाचे तर पहिलवान अशी प्रचंड रक्कम मागतात की, आपल्यासारख्या सामान्यांची ती रक्कम ऐकतानाच छाती दडपून जाते. मध्यंतरी होणार होणार म्हणून गाजत असलेली गोगा (पाकिस्तान) आणि हिंदकेसरी मारुती माने या कुस्तीसाठी मारुती मानेने एक लाख रुपये मागितले होते. एवढी मोठी आंतरराष्ट्रीय कुस्ती परत झालीच नसती हे खरे, परंतु तरीही कोल्हापूर जिल्हा तालीमसंघ सत्तर हजार आकड्यावर तोडण्यास तयार होते. हे आकडे कळल्यावर सांगलीचा एक शौकीन म्हणत होता; एवढे पैसे द्यावयाचे म्हणजे जमीन १० रु आणि पुढची खुर्ची ५० रुपये ठेवावी लागेल. पण तरीही लोक गर्दी करतील. ही कुस्ती शेवटी झालीच नाही हे खरे, पण एवढी मोठी मैदाने कोल्हापूर वा मुंबई सोडून दुसरीकडे कोठे भरवणे शक्यही होत नाही. अशी मैदाने जर निकाली ठरली नाहीत तर मग शौकीन नाराज होतात. पुढचे मैदान तोट्यात जाते. त्यामुळे ठेकेदार मोठे मैदान भरवायला बिचकतो. मोठी मैदाने नाहीत की पहिलवान लवकर मोठा होत नाही असे हे दुष्टचक्र चालू होते. बदनाम झालेल्या मुंबईच्या मैदानावर मोठी कुस्ती निकाली झाली ह्याने म्हणूनच सर्वांना हायसे वाटले.

ह्यामधे काही श्रेय ठेकेदारांच्या पूर्व नियोजनला द्यावे लागेल. सहा-सहा महिने आधी तयारीच्या खुराकासाठी दोन्ही मल्लांना काही हजारांत ठेके-

दारांनी रकमा मोजल्या होत्या. पहिलवानांचा खुराक ही आपल्या चटकन ध्यानात न येणारी गोष्ट आहे. परवा ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केलेले माहुलीचे श्रीरंग जाधव यांच्या बोलण्यात हा मुद्दा आल्यावर मला याचे महत्त्व पटले. ते म्हणाले, 'आणखी काही दिवसांनी बदाम बी, खारीक, चांगले तूप ह्या गोष्टी छोट्या बरण्यांतून घालून प्रदर्शनातून मुलांना दाखविण्यासाठीच मांडून ठेवाव्या लागतील.' पहिलवानाला खुराकासाठी लागणाऱ्या वस्तूंचे भयंकर दर बघितले की हे खरे ठरेल असे वाटू लागते. श्रीरंग जाधवांना त्यांच्यावेळी दिवसाला पावशेर बदाम बी लागत. आज त्याची किंमत १०० रु. किलो झाली आहे व मोठे कुस्तीगीर महाराष्ट्रात न वाढण्यामागे हेही एक महत्त्वाचे कारण या वाढत्या महागाईच्या दिवसात झाले आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरू नये. या कुस्तीपुरता तरी हा प्रश्न ठेकेदारांनी यशस्वीपणे सोडविला.

कुस्ती बेमुदत निकाली होणार अशी आरोळी न ठोकणारे कुठलीच जाहिरात कधी कुस्तीच्या वेळेस निघत नाही. परंतु तरीही काटा जोड कुस्ती क्वचितच निकाली होतात. याचे खरे कारण म्हणजे मार खाल्लेल्या पहिलवानाचा बाजारभाव एकदम उतरतो. दुसऱ्या कुठल्याही खेळात एखादे वेळेस मार खाल्ल्याची एवढी जबरदस्त किंमत मोजावी लागत नसेल. यामुळे लोकांना चमकदार निकाली कुस्ती व्हावी असे कितीही वाटत असले तरी या निकालाची किंमत काय जबर मोजावी लागते याची दोन्हीही बाजूंना पुरेपूर कल्पना असते. एकदा मारलेल्या पहिलवानाबरोबर पुन्हा खेळायला जिंकलेला पहिलवान सहसा तयार होत नाही आणि झाला तर अव्वाच्या सव्वा दर मागतो. विष्णू सावर्डे आणि मारुती मानेची चुरस हे याचे प्रसिद्ध उदाहरण. विष्णू सावर्डेने मारुतीला एकदा मारल्यावर पुन्हा ती कुस्ती ठरविण्यासाठी महाप्रयास पडले. त्याआधी मारुती मानेला महंमद हनीफला (त्याला विष्णूने मारला होता) चितपट मारण्याची अट पुरी करावी लागली आणि नंतर प्रत्यक्ष झालेली कुस्ती अमानुषपणे ३ तास गॅसबत्तीच्या प्रकाशात खेळून, मान्यवर पुढाऱ्यांच्या कुस्ती सोडवण्याचा उपदेश धुडकावून लावून कुस्ती निकालीच करावी लागली. त्याचवेळी मारुती मानेचा पुढचा मार्ग मोकळा झाला. या सर्व पार्श्वभूमीवरही या निकाली कुस्त्यांचे कौतुक व्हावयास हवे.

महाराष्ट्रात आज तरी एवढे मोठे मल्ल नाहीत. विष्णु सावर्डे, गणपत आंदळकर, शामराव मोरे यांचा जमाना आता इतिहास जमा होत आहे. आडदांड ताकतीचा दादू चौगले, हुशार हरिश्चंद्र बिरासदार, आशा बाळगाव्यात असा सातारचा साहेबराव जाधव ह्या सगळ्यांचे हात कळसापर्यंत पोचायला अजून अवकाश आहे. मारुती मानेला जोड नाही आणि त्यामुळे तो फारसा व्यायामात नाही. हजरत पटेल व्याया-

मात असला तरी जोड धरण्याच्या भानगडीत फारसा पडत नाही. तेव्हा सध्यातरी महाराष्ट्रातील कुस्ती शौकीनांना भरपूर औत्सुक्य वाटेल अशी एकच जोड महाराष्ट्रात होती.

शिवाय भाऊबंदकीची चुरस काही वेगळीच असते. एकाच भागातल्या-गावातल्या दोन मल्लांच्या चुरशीच्या लढतीचा ताण आणि रंग त्यापेक्षाही मोठ्या दुसऱ्या प्रकारच्या कुस्तीला येईलच असे नसते. सत्तर हजारावर प्रेक्षकांनी खासबाग भरल्यानंतरही बाहेर हजारो लोक तिकीटाअभावी रहातात हे मारूती माने, विष्णू सावर्डेच्या कुस्तीचे उदाहरण हा याचा प्रत्यक्ष पुरावा. एवढी गर्दी नंतर सादिक पंजाबी-चंदगीराम यांच्या कुस्तीलाही झाली नाही. चंबा आणि दीनानाथ सिंह यांच्याबदल हेच खरे होते. सावर्डे निदान सांगलीचा तर होता पण येथे चंबा मोतीबाग तालमीचा तर दीनानाथ सिंह गंगावेस तालमीचा. कोल्हापुरातल्या ह्या प्रसिद्ध प्रतिष्ठित तालमी नेहमीच आव्हान प्रतिआव्हानांनी घुमणाऱ्या. दीनानाथसिंह प्रथम सांगलीच्या भोसले व्यायाम शाळेत बेलीफ ढाकवाले यांच्या हाताखाली होता. नंतर बाबूराव गवळीच्या मार्गदर्शनाखाली १९६५ सालापासून तो गंगावेस तालमीत दाखल झाला. १९६९ सालच्या सिमल्याच्या स्पर्धेत मिडलवेट गटाचे अजिक्यपद मिळवून त्यानी सुवर्णपद मिळवले. आणि १९७१ साली नागपूरच्या कुस्ती-स्पर्धेत तो हिंदकेसरी झाला.

मुतनाळ गावच्या (बेळगाव जिल्हा) चंबाची सर्व वाढ कोल्हापुरातच झाली. महाराष्ट्रातील कुस्ती शौकीनात त्याच्याबद्दल सध्या भलतेच कौतुकानं बोलले जाते. १९६४ साली पंजाब येथे राष्ट्रीय स्पर्धेत त्याने लाईटवेट गटाचे सुवर्णपदक मिळवले. १९६७–६८ या लागोपाठ दोन वर्षे परशुराम पाटीलला हरवून तो महाराष्ट्र केसरी झाला. १९६९ साली लखनौ येथे भारतभीम स्पर्धेत अंतिमफेरीत त्याची चंदगीरामशी झालेली लढत ही विलक्षण गाजली. दुर्दैवाने दुखापत झाल्याने त्याला अर्धातच थांबावे लागले. १९७१ साली चंदगीरामशी चाळीस मिनिटे मुंबईच्या मैदानावर जबरदस्त खेळ करून त्याने स्वत:ची प्रतिमा आणखी उजळविली. १९६६ च्या जळगावच्या कुस्तीगीर परिषदेच्या अधिवेशनात मात्र दीनानाथसिंहने चंबावर अवघ्या एक गुणानी (तेवढा एकच गुण त्याला सबंध वेळात मिळाला) मात केली. हा एकमेव गुण पक्षपातीपणाचा असल्याबद्दलचा आपला निषेध मात्र त्यावेळी चंबाने नोंदवला होता. या साऱ्या पार्श्वभूमीवर चमकदार कुस्तीचे समाधान मात्र काही प्रेक्षकांना कुस्ती निकाली होऊनही मिळाले नाही. कुस्ती सुरुवातीची ३५ मिनिटे अगदी थंड झाली. दीना चंबाहून थोडा अधिक उंच त्यामुळे तो चंबाला आपल्या अंगाला भिडू देत नव्हता. ढाक आणि आतली टांग हे चंबाचे आवडीचे डाव. चंबाने दोन वेळा बाहेरची टांग लावण्याचा प्रयत्न केला पण ते अ-

यशस्वी झाले. अखेर ३७ व्या मिनिटाला चंबाला दीनानाथच्या पटात घुसण्याची संधी मिळाली ती त्याने अचूक साधली. दोन्ही मल्ल आखाड्याच्या कडेवर गेले. आता पंचही झटापट सोडवून आपल्याला आत घेतील या कल्पनेत असलेल्या बेसावध दीनानाथला चंबाने चपळाईने क्षणाचाही विलंब न लावता दाबले आणि जळगावचा बदला घेतला. चंबाचे कौतुक झालेच पण पराभवानंतर आखाडा सोडून न पळणाऱ्या, उगाच आरडाओरडा न करणारा आणि पंचानी झटापट वेळीच न सोडविल्याबद्दल नापसंती संयमित शब्दातच व्यक्त करणाऱ्या दीनानाथचेही कौतुक सुजाण प्रेक्षकांनी केले.

कुस्ती कडेवर गेल्यानंतर पंचाच्याकडे डोळे लावून बसण्याची आणि बेसावध राहण्याची ही महाराष्ट्रातील मल्लाना जुनी खोडच आहे असे अनेक वर्षे इंदूरच्या आखाड्यात घालवलेला सुविद्य कुस्तीगीर विनायक मांढरे मला म्हणाला. आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ्य त्याने याच पद्धतीने मास्टर चंदगीरामने इंदूरच्या आखाड्यात हजरत पटेल आणि अहमद चार्लीला लोळवण्याची आठवण सांगितली.

आखाडयाच्या लॉबीतही, थोडक्यात संपूर्ण मैदानातच संपूर्ण वेळ पूर्वत: सावधान रहाणे हे अत्यावश्यक असण्याचे निदान या कुस्तीनंतर तरी महाराष्ट्र मल्लांच्या ध्यानात येईल.केवळ यामुळेच अजिबात दमछाक न झालेला दीनानाथ चीतपट झाला आणि कुस्तीला खरा रंग भरू लागणार तेवढयातच कुस्ती संपली. दीनानाथाच्या अपयशात चटकदार कुस्ती न बघावयास मिळालेल्या प्रेक्षकांच्या असमाधानाची भर पडली.

असो. कुस्ती निकाली झाली हेही थोडके नसे. गेले दोन वर्षे थंड असलेली तांबडी माती निदान या निमित्ताने घुसळू लागली. या मातीचा जोष, भारतभीम पासून रुस्तुमे हिंदपर्यंत सगळे किताब धारण करणाऱ्या आणि महाराष्ट्राला कायमचे आव्हान देऊन बसलेल्या चंदगीरामबरोबर झुंजण्यासाठी बाहेर पडेल त्यावेळी तांबड्या मातीच्या रणधुमाळीत खरीखुरी रंगत भरेल. ● ● ●

---


यापुढील

**माणूस**

**१७ फेब्रुवारी अंक**

# व्हिएतनाम विशेषांक

**किंमत पन्नास पैसे**

निमित्त

# सव्वीस जानेवारी

सुनिल कर्णिक

२५ जानेवारीची रात्र.

ठाण्याच्या भारत-रशिया सांस्कृतिक संघातर्फे आयोजित करण्यात आलेली जाहीर सभा. स्थळ ठाण्याचेच संग्रहालय. सभेचा विषय : भारतीय प्रजासत्ताकाची पंचवीस वर्षे आणि सोविएत संघराज्याची पन्नास वर्षे. व्याख्याते : रशियन पाहुणे प्रा. मस्कालेंको आणि प्रा. सदा कऱ्हाडे.

मी गेलो तेव्हा सभा सुरू झालेली होती. अडीच-तीन लाख वस्तीच्या या शहरातील उपस्थित असलेल्या पंधरा-वीस जणांना पाहुण्यांचा परिचय करून देण्याचे आयोजकांचे काम जवळजवळ संपत आले होते. मग त्यांनी प्रमुख पाहुण्यांना — प्रा. मस्कालेंको यांना — बोलण्याची विनंती केली. पाहुणे बोलण्यासाठी उठले; 'नमस्ते' करून त्यांनी बोलण्यास सुरुवात केली. इंग्रजीत अतिशय हळू आवाजात, तुकतुकीत अंगकांतीचा, चमकदार डोळ्यांचा हा माणूस श्रोत्यांच्या प्रतिक्रियांचा अंदाज घेत, संथपणे, काहीसा अडखळत बोलत होता, ते पाहून या प्राध्यापकाला विद्यार्थ्यांसमोर तरी व्याख्यान देण्याचा सराव असेल का, अशी शंका आल्यावाचून राहिली नाही. रशियाविषयी परिचयपर बोलण्याचे त्याला सांगण्यात आले होते, आणि हे करताना आवाजात चढउतार करणे जरूरीचे वाटले नसावे, हे साहजिकच आहे. पण गंमत म्हणजे स्वतःच्या देशाविषयी माहिती देताना हा माणूस मध्येच अडत होता, आणि आपले आयोजक त्याच्या मदतीला धावत होते ! श्रोत्यांमधला एखादा उठून गेला की वक्त्याच्या पोटात भीतीचा गोळा आल्याचे त्याच्या कावऱ्याबावऱ्या नजरेवरून दिसत होते; —एखादा श्रोता वाढला की त्याच्या आवाजाला टवटवी आल्यासारखी वाटे ! असो. अधूनमधून काही टिपणे वाचून दाखवीत, जर्मनी, पोलंड, अमेरिका वगैरे देशांची काही तुरळक ठिकाणी तुलना करीत पाहुण्यांनी आपले काम

पुरे केले. औपचारिक टाळ्या पडल्या.

पुन्हा आयोजक उभे राहिले. ते म्हणाले, "आपले पाहुणे इंग्रजीतून बोलल्यामुळे काही श्रोत्यांना ते समजले नसावे, आणि त्यामुळे त्यांना ते कंटाळवाणे वाटले असावे, हे त्यांच्या चेहऱ्यावरून दिसतंय. तेव्हा आता मी प्रा. कऱ्हाडे यांना पाहुण्यांचे विचार श्रोत्यांपुढे मराठीतून मांडण्याची विनंती करतो."

प्रा. कऱ्हाडे : मित्रहो, सभेसाठी मला बोलवण्यात आले, तेव्हा मला नेमका असा कोणताही विषय देण्यात आलेला नव्हता. फक्त 'यू शूड स्पीक अ फ्यू वर्डस्' एवढंच त्या पत्रात लिहिलेलं होतं. मी 'इस्कस'चे (म्हणजेच भारत-रशिया सांस्कृतिक संघाचे) काम करीत असतोच; म्हणून या सभेलाही हजर राहिलो आहे. आता मला प्रा. मस्कालेंको यांचे विचार सांगण्यास सांगितले आहे ते मी करतो, आणि मग माझे म्हणणे मांडतो. प्रा. मस्कालेंको यांनी महान ऑक्टोबर क्रांतीपूर्वीचा रशिया आणि आताचा रशिया यांच्यातील फरक स्पष्ट केला. त्यांनी सांगितलं की आज रशियामध्ये जवळजवळ सगळा समाज साक्षर झालेला आहे; तेथे स्त्रीदास्यविमोचनाचे फार मोठे कार्य झाले आहे; आणि जातिभेद, भाषिक भेद यांवर मात करून रशिया आपली प्रगती करीत आहे. सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे जगातलं हे पहिलं कामगार राष्ट्र आहे, आणि अनेक संकटांना तोंड देऊन ते पन्नास वर्षे तगून राहिलं आहे, एवढंच नव्हे तर भरघोस प्रगती करीत आहे. (मला स्वतःला प्रा. मस्कालेंको यांच्या भाषणातील 'सोविएत संघराज्यात काही राज्यांना लोकशाही कारभार करण्याची मोकळीक आहे' ही माहितीच लक्षवेधक वाटली. अर्थात तिचा संबंध संघराज्याच्या ५० वर्षांशी फारसा नसावा; त्यामुळे प्रा. कऱ्हाडे यांनी हा भाग वगळला.) आता मला या प्रसंगी असं म्हणायचं आहे, की रशियाने केलेली प्रचंड प्रगती आपण पाहिली, आणि भारताने आपल्या स्वातंत्र्याच्या पंचवीस वर्षांत काय केलंय हे तर आपल्याला ठाऊकच आहे; तर तिथे जी शासनव्यवस्था गेली पन्नास वर्षे कार्य करतेय ती आपल्या इथे लागू करण्याविषयी आपण काही विचार करणार आहोत की नाही? मित्रहो, रशियाचा प्रचार करण्याच्या दृष्टीने मी हे सांगत नाही. कारण मी कोणत्याही पक्षाचा सभासद नाही किंवा कार्यकर्ता नाही. पण भारत-रशिया मित्रमंडळातील एक निश्चितच आहे. आणि आपणही विचार करून पहा. गेल्या पंचवीस वर्षांत आपल्याला काय मिळाले? स्वातंत्र्यानंतर ज्या चार ध्येयांसाठी राज्यकारभार करण्याची आपण प्रतिज्ञा केली आहे, ती कितपत पुरी झाली? कॉन्स्टिटयूशनच्या प्रिॲम्बलमध्ये लॉ, लिबर्टी, इक्वॅलिटी, ॲण्ड फ्रॅटर्निटी अशी चार ध्येये आपण मानली आहेत. त्यापैकी एकही आपल्याला पुरे करता आलेले नाही. अलिकडे दलित समाज जो आक्रोश करू लागला आहे त्याकडे

लक्ष दिले तरी न्याय-स्वातंत्र्य-समता-बंधुभावाच्या कल्पना कागदावरच राहिल्या आहेत, हे लक्षात येते. आता आणखी पंचवीस वर्षे अशीच गेली, आणि एखाद्याने आपल्याला विचारले की भारताने पन्नास वर्षांत काय केले, तर आपण काय उत्तर देणार आहोत? रशियाचे उदाहरण पाहा. तिथेही अशिक्षित समाज होता, स्त्रिया दास्यात होत्या, आपल्यासारख्याच खूप भाषा, जाती होत्या. बरीचशी आपल्यासारखी स्थिती तेथे होती. अर्थात प्रत्येक बाबतीत रशियाचे अनुकरण करावे असे माझे म्हणणे नाही. कारण परंपरा, इतिहास, भूगोल वगैरे गोष्टी दोन्ही देशांत वेगवेगळ्या आहेत. आणि मार्क्सइझम किंवा लेनिनिझम जसाच्या तसा एका ठिकाणचा दुसऱ्या ठिकाणी लागू करावा असे मीच काय कोणीच सांगणार नाही. परिस्थितीप्रमाणे बदलायला हवे...शिक्षणाचे पहा. असे म्हणतात की तुम्हाला ग्रॅज्युएट लेव्हलचे शिक्षण घ्यायचे असेल तर तुम्ही इंग्लंडमध्ये जा, पोस्ट-ग्रॅज्युएट रिसर्च करायचे असेल तर अमेरिकेत जा, पण तुम्हाला सोशालिस्ट शिक्षण हवे असेल तर तुम्ही रशियात जा! हे रशियाचे वैशिष्ट्यच आहे. मुलांना चांगले शिक्षण मिळाले की ते चांगले नागरीक बनतात आणि मग अशा नागरिकांचे राष्ट्र चांगले बनणारच..... रशियातल्या लोकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी जबर किंमत दिलीय. अनेक गावे बेचिराख केली गेली, हजारो लोक मत्यमखी पडले, तेव्हा त्यांना हे स्वातंत्र्य मिळालंय. आणि स्वतःच्या बांधवांच्या रक्ताचे मोल दिलेले असल्यामुळेच हे स्वातंत्र्य आपण टिकवून ठेवले पाहिजे, अशी तिथल्या प्रत्येक माणसाची भावना असते...मला असे वाटते की स्वातंत्र्यानंतर आपल्या जीवनात एक प्रकारचा अंतर्विरोध निर्माण झाला आहे. एका बाजूने आपण म्हणतो की जाती नष्ट करू या, वर्णव्यवस्था नष्ट करू या, आणि दुसऱ्या बाजूला प्रत्येक जातीचं संमेलन भरतंय, आपल्या जातीकरता शिष्यवृत्त्या, पारितोषिके जाहीर केली जातायत...मला वाटतं आपण उच्चवर्गीयांतला एखादाच विद्यार्थी असा असेल की ज्याला मागासलेल्या जमातीतला मुलगा आपल्या बरोबरीला आल्याचा मनापासून आनंद होत असेल; 'बाबारे, गेली हजारो वर्षे तुम्ही अन्यायात पिचत होतात, चल, आता आपण बरोबरीने जाऊ,' असं तो त्याला सांगत असेल...स्त्री दास्यविमोचन तरी आपल्याकडे कितपत झालंय?...तर अशा वेळी आपण रशियाकडून प्रेरणा घ्यायला हवी. मित्रत्वाच्या भावनेने. आपल्या एका प्राचीन कवीने 'सन्मित्रा'ची लक्षणं सांगताना म्हटलंय की जो संकटाच्या वेळी आपल्या मदतीला धावून येतो, एवढेच नव्हे, तर प्रसंगी आपले दोष झाकून गुणांचे कौतुक करतो, तो सन्मित्र...

प्रा. कऱ्हाडे मला 'दोष झाकून गुणांचे कौतुक करणाऱ्या' सन्मित्राच्या लक्षणाला पुरेपूर उतरल्यासारखे वाटले!

रशियात विचारस्वातंत्र्याची गळचेपी होते, य प्रवादाला त्यांनी हात लावला नाही. भारताची आणि रशियाची तुलना करताना, रशियाने पहिल्या पंचवीस वर्षात किती प्रगती केली होती हे त्यांनी सांगितले नाहीच. आणि लोकशाही भारताच्या पंचवीस वर्षात तयार झालेली स्वत: कऱ्हाडे यांच्या-सारखी काही माणसे तरी या देशात असता पुढल्या पंचवीस वर्षांत काहीच होणार नाही, असा त्यांचा सूर ऐकून नवल वाटले !

त्यांनी भारत-रशिया सांस्कृतिक संघाला एक चांगली सूचना केली. ते म्हणाले, या सभा वगैरे सगळे ठीक आहे, त्या अधूनमधून होतातच. पण ते पुरेसे नाही. रशियासंबंधी एखाद्याला काही शंका असतील, माहिती हवी असेल, तर त्यासाठी माहिती-केंद्र उघडायला हवे.

त्यांच्या भाषणानंतर आयोजकांनी सांगितले की कोणाला काही प्रश्न पाहुण्यांना विचारायचे असल्यास ते लवकर विचारावेत, कारण वेळ फार झाला आहे. एका मिनटाच्या आतच ते पुन्हा उभे राहिले. पाहुण्यांना पुष्पगुच्छ वगैरे देण्यासाठी.. ते होताच कार्यक्रम संपला.

अशा सभांमध्ये राष्ट्रगीत वगैरे म्हटले नाही तरी चालते की काय कुणास ठाऊक. वक्ते उठले, सभा संपली.

● ● ●


राजा शिवछत्रपती

ब. मो. पुरंदरे

किंमत : तीस रुपये

प्रकाशक

महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठान

सातारा

एकमेव विक्रेते

राजहंस प्रकाशन

पुणे

## मुक्काम मालेगाव

पृष्ठ ५ वरून

लयात प्रवेश देतेवेळी रुपये ५०० ते १५०० स्वीकारणे योग्य की अयोग्य हे चौकशीची आश्वासने देणाऱ्या शासनाने ठरवावे. पण त्या रकमेतून आम्हाला जगण्यासाठी थोडीफार मदत द्या अशी मागणी करणे म्हणजे विद्यार्थ्यांनी बेतालपणे वागणे असे होऊ शकत नाही. पण या राज्यात तेही घडले. एकीकडे शिक्षक दिन राष्ट्रीय पातळीवरून साजरा केला गेला आणि याच १५० शिक्षकांच्या हातात दुसरीकडे हातकड्याही अडकवल्या गेल्या !

ही कॅपिटेशन फी ज्यांच्याकडून घेतली ते शिक्षक आहेत. बी. एड्. झाल्यानंतर ते स्वतंत्रपणे अनेक शाळांतून मुख्याध्यापक या नात्याने सूत्रेही हाती घेतील आणि विद्यार्थ्यांना प्रवेश देताना विनापावती रकमाही स्वीकारतील. यात मग गैर काय ? त्यांना तथाकथित शिक्षणमहर्षींकडून हाच आदर्श लाभला आहे.

मी प्रशिक्षणार्थींच्या नेत्यांपैकी व अनुयायांपैकी सर्वश्री एस. आर. सूर्यवंशी, व्ही. के. सावंत, जे. टी. सोनवणे, एस. बी. सोनवणे, एच. टी. पाटील, सी. पी. शित्रे, जी. बी. देसाई, सौ. देसाई, झोपे आदींना भेटलो. त्यांनी विद्यामंदिरातील पुजाऱ्यांच्या भ्रष्टाचाराच्या अनेक कथा ऐकवल्या. जोपर्यंत त्या उजेडात आल्या नाहीत, तोवर कोणाचाही विश्वास त्यावर बसणे अशक्य. पराचा कावळा होतो किंवा राईचा पर्वतही केला जातो तेव्हा पर अथवा राई आहे हे गृहीत धरले जाते. पाऊण कोटींच्या बजेटात हे पर व राई असणे गांधींचे नाव घेणाऱ्यांना शोभत नाही. राष्ट्रपुरुषाच्या आत्म्याला क्लेश का ?

वृत्तपत्रप्रतिनिधी या नात्याने चौकशी केली तेव्हा सारेच नाराज झाले. या प्रकरणात काही वृत्तपत्रे पक्षपातीपणाने वागत आहेत. अन्यायकर्त्याला धडा शिकविणारा मराठा, बुद्धिजीवी वर्गात लोकप्रिय असलेले महाराष्ट्र टाइम्स, लोकमान्यांचा केसरी ही पत्रे आमची भूमिका समजावून न घेता आम्ही विद्यार्थी म्हणजे विध्वंसनाचे खास शिक्षण घेतलेले नक्षलाईट्स् आहोत असे समजून मालेगावाहून गेलेल्या बातम्या छापीत आहेत. कॅपिटेशन फीपेक्षाही हा वृत्तपत्रीय अन्याय अधिक जाचक वाटतो.

प्रारंभी संस्था चालकांनी मागणी धुडकावून लावली. आम्ही जोर केला तेव्हा आमच्या ग्रामीण भागातील अज्ञ पालकांना धमक्या देऊन ही रक्कम संस्थेला राजीखुशीने देणगीदाखल देण्यात आल्याचे लिहून घेण्यात आले. आम्ही स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत. रकमा आम्ही दिल्या आहेत. हे रेकॉर्ड ग्राह्य मानू नये असे विद्यार्थी–शिक्षकांचे म्हणणे आहे !

दिनांक ११ जानेवारी १९७३ !

दुष्काळी विभाग व दुष्काळी कामांची पाहणी करण्यासाठी मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक धुळ्याहून नासिककडे निघाले. वाटेत ते चिखल ओहोळ डाक बंगल्यावर थांबले होते. बंगल्याबाहेर विद्यार्थी शांतपणे बसून होते. मंत्र्यांच्या गाड्या आल्या. विद्यार्थ्यांनी 'मुख्यमंत्री नाईक झिंदाबाद, नाईकांचा विजय असो'चे नारे लावले. मग मात्र मला या भावी पिढीच्या शिल्पकारांची कीव आली. ज्या शासनाने मंत्र्यांकडे शिष्टमंडळे नेऊनही तुमच्यावरील अन्यायाची ४५ दिवसांत दखल घेतली नाही त्यांचा जयजयकार कशासाठी, असा प्रश्न मी विचारला. तेव्हा उत्तर मिळाले नाही, पण दुसरे काय करणार, अशीही भावना दिसली.

ना. नाईकांनी वॉश घेतला. नासिक जिल्ह्यातील बहुतेक सर्व लोकनियुक्त आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ५ विद्यार्थ्यांचे एक शिष्टमंडळ नाईकांना भेटले. ना. नाईकांनी विद्यार्थ्यांसमोर एक भाषणही ठोकले व आश्वासन दिले– 'तुमच्यावर झालेल्या अन्यायाच्या चौकशीसाठी एका खास अधिकाऱ्याची मी नेमणूक येथेच जाहीर करतो. तुम्ही संप मागे घ्या!'

आणि त्यांनी विद्यार्थ्यांचे एक निवेदनही स्वीकारले. निवेदनात १ : बैल, २ : म्हैस, ३ पत्रे, ४ : धान्य, ५ : बडकस फरक अशी अनेक प्रकरणे आहेत. एक एक प्रकरण म्हणजे चढती कमान आहे. चौकशीत काय निघेल सांगता येत नाही.

चौकशी होईल! कोणी सापडेल, कोणी सुटेल, पण २६९ विद्यार्थी–शिक्षकांचे वर्ष फुकट जाईल. दुष्काळी परिस्थितीमुळे त्यांना अधिकाधिक अडचणी, समस्या, दारिद्र्य याला तोंड द्यावे लागेल याची जबाबदारी कोणावर?

–रघुवीर मुळे


हिंदुस्तान विशेषांक
माणूस
१७ फेब्रुवारी १९७३
किंमत : पन्नास पैसे

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH-649

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यासाठी
# निधीचे आवाहन

सा. न. वि. वि.

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांचा पुतळा पुण्यात उभा केला गेल्यास त्यांची स्मृति चिरंतन होऊन भावी पिढ्यांनाही ज्वलंत देशभक्तीची स्फूर्ती देत राहील, या उद्देशाने जयमहाराष्ट्र मंडळाने असा पुतळा उभारण्याचा संकल्प केला असून, त्यास आम्ही आमचे सारे सहकार्य देत आहोत. हा पूर्णाकृती ब्राँझचा पुतळा शिवाजीपुलापासून (नवा पूल) फुटणाऱ्या व नदीकाठाने जाणाऱ्या रस्त्यावर शनिवारवाड्यासमोर उभा करण्याचा विचार आहे. या पुतळ्यासाठी साधारणत: ३० ते ३५ हजार रुपये खर्च येईल. आतापर्यंत जयमहाराष्ट्र मंडळ, कसबा पेठ, यांनी दहा हजारांच्या घरात रक्कम जमविली असून, आणखीही जमवीत आहेत. या पुतळ्याच्या उभारणीसाठी मोठी रक्कम लागणार आहे हे लक्षात घेऊन, आपण या कार्यास सढळ हाताने साहाय्य करावे ही विनंती.

आपली देणगी खालील पत्त्यावर पाठवावी ही विनंती.

१. काका वडके, अध्यक्ष, जयमहाराष्ट्र मंडळ ६४० कसबा पेठ, पुणे ११

२. केसरी कार्यालय, ५६८ नारायण पेठ, पुणे ३०

आपले

ज. श्री. टिळक

निळूभाऊ लिमये, महापौर, पुणे
अतूर संगतानी
ग. वा. बेहरे
ना. वि. रुकारी, अध्यक्ष शहर काँग्रेस
चं. प. भिशीकर
वसंतराव काणे
ब. ना. भिडे
मामाराव दाते
वा. ब. गोगटे

मुकुंदराव किर्लोस्कर
भाऊसाहेब शिरोळे
ग. दि. माडगूळकर
बाजीराव कांबळे, ॲडव्होकेट
रा. का. म्हाळगी, आमदार
वा. रा. कोठारी
मा. ग. दीक्षित
भा. वि. मोकाशी
गोपाळ गोडसे
काका वडके

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुण येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर